सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३६४ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जेष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. १२ एप्रिल :** प्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांचे मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांना काल (शनिवार ११ एप्रिल २०२६) हृदयविकाराचा झटका आल्यामुळे ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आशा भोसलेंची नात झानई भोसले हिने इन्स्टा पोस्ट करून आजी ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत असल्याचे सांगितले होते.



आशा भोसले मागील सात दशकांपासून पार्श्वगायन करत होत्या. त्यांनी मराठी, हिंदीसह अनेक भाषांतील चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले. चुनरिया या १९४८ मध्ये आलेल्या चित्रपटापासून आशा भोसले यांच्या पार्श्वगायनाच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. त्यांनी वीसपेक्षा जास्त भाषांमध्ये १६ हजारांपेक्षा जास्त गाणी गायली. मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तमिळ, मल्याळम, इंग्रजी आणि रशियनसह एकूण २० भाषांमध्ये आशा भोसले यांनी पार्श्वगायन केले.

चतुरस्त्र गायिका आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी झाला. लता मंगेशकर त्यांची मोठी बहीण. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्या सुमधुर आवाजाने कोट्यवधी रसिकांना वेड लावले. आशा भोसलेंनी दोन हजारांपेक्षा जास्त चित्रपटांतून गाणी गायली. अनेक अल्बमसाठीही त्यांनी गाणी गायली. आशा भोसलेंना २००८ मध्ये पद्मविभूषण या पुरस्काराने गौरविण्यात आले. इतर अनेक पुरस्कारांनीही त्यांना गौरविण्यात आले होते.

रोमँटिक, गझल, पॉप, आयटम साँग अशा सगळ्या प्रकारची गाणी त्यांनी गायली. आशा भोसलेंची आरडी बर्मन यांच्यासोबतची जोडी खूप गाजली. पिया तू अब तो आजा, दम मारो दम, चुरा लिया है तुमने ही त्यांची प्रसिद्ध गाणी आहेत.

आशा भोसले यांनी अनेक फिल्मफेअर आणि राष्ट्रीय पुरस्कार जिंकले आहेत. त्यांना पद्मविभूषण आणि पद्मभूषण या दोन्ही पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.

आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी सांगितल्यानुसार अशा भोसले यांच्या राहत्या घरी म्हणजेच लोअर परेल येथील कासा ग्रांडेमध्ये उद्या (सोमवार १३ एप्रिल) सकाळी ११ वाजल्यापासून लोक त्यांचे अंतिम दर्शन घेऊ शकतील आणि दुपारी ४ वाजता शिवाजी पार्कमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

## पंतप्रधान मोदींनी वाहिली खास मराठीतून आदरांजली

नवी दिल्ली : स्वरस्वामिनी आशा भोसले यांना पंतप्रधान मोदींनी वाहिली खास मराठीतून आदरांजली वाहिली आहे. भारतातील सर्वात ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले जी यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला. भावपूर्ण गीतांपासून ते जोशपूर्ण संगीत रचनांपर्यंत, त्यांच्या आवाजात कालातीत तेज होते. त्यांच्याशी झालेल्या संवादांच्या आठवणी मी सदैव जपून ठेवेन.त्यांच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना आणि संगीतप्रेमींना माझ्या भावपूर्ण संवेदना. त्या पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सदैव लोकांच्या आयुष्यात गुंजत राहतील.पंतप्रधान मोदींसह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी देखील अशा भोसले यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह अनेक मान्यवरांनी आशाताईंना श्रद्धांजली अर्पण केली आहे.



### सावधान ! आता महाराष्ट्रातही अवतरतोय ‘बिहार’ पॅटर्न

# रस्त्याआधीच पूर्णा नदीवर उभारला ९५ कोटींचा पूल

**तभा वृत्तसेवा / मोहन धारासूरकर**

**परभणी, दि. १२ एप्रिल :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वात आपल्या महाराष्ट्र राज्याची प्रगती वेगाने होत असतानाच सत्ताधाऱ्यांनाही अंधारात ठेवून आपला स्वार्थ साधून घेण्यात प्रशासन अत्यंत तत्पर असल्याचा प्रकार परभणी जिल्ह्यात उजेडात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजन शून्य कारभाराचे हे एक उत्तम उदाहरण ठरावे असा हा प्रकार आहे. रस्त्याची उभारणी करण्याआधीच पूर्णा नदीवर चक्क ९५ कोटींचा पूल उभारण्याची किमया सा. बां . विभागाच्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी करून दाखविली आहे.




आपल्याकडे चित्रपटाच्या माध्यमातून चक्क विहीरच चोरीला जाणे, रस्ता चोरीला जाण्याचे प्रकार उपहासात्मक स्वरूपात प्रेक्षकांना दाखविले जातात. त्याचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी न करता प्रबोधनात्मकरित्या व्हावा हा त्यामागचा संबंधितांचा उद्देश असावा असे आपण समजू या. अगदी एखाद्या हिंदी चित्रपटात शोभावा असाच काहीसा प्रकार परभणी – हिंगोली जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या पूर्णा नदीवर घडला आहे. या नदीवर मुंबईच्या वरळी सी लिंकच्या धर्तीवर पुलाचे बांधकाम करण्यात आले आहे. पूर्णत्वास जाणारा हा पूल रस्त्याला न जोडला जाता तो सरळ एका शेतकऱ्याच्या शेतात पोहाेचतो. पुलाची उभारणी करण्यापूर्वी तो पूल कोणत्या रस्त्याशी जोडला जाणार आहे, त्या रस्त्यासाठीच्या जमिनीचे अधिग्रहण करणे गरजेचे असते. या ठिकाणी जमिनीचे अधिग्रहण न करताच केवळ ’ कंत्राटदारा’च्या सोयीसाठी शासनाने तब्बल ९५ कोटी रुपये खर्चून हा पूल उभारला की काय ? असा संतप्त सवाल नागरीकातून केला जात आहे.

भूसंपादन प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय कोणताही प्रकल्प सुरु करता येत नाही, हा साधा नियम परभणी जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना ज्ञात नाही की काय ? अशी शंकाही याठिकाणी उपस्थित केली जात आहे. आपला महाराष्ट्र पुरोगामी विचारधारेचा म्हणून ओळखला जातो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. असे असतानाही प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यांची लॉबी अशा प्रकारच्या गैरकृत्यांना थारा देत असल्याचेच या प्रकरणावरून निदर्शनास येते. असे प्रकार पूर्वी बिहार राज्यात घडत असल्याचे उपरोधाने बोलले जात असे. तोच प्रकार आणि पायंडा आता महाराष्ट्रात सुरु होताना दिसतोय. परभणी – हिंगोली जिल्ह्याचे लोकप्रतिनिधी विधानसभेत व लोकसभेत नेमके काय करतात ? हे समजायला मार्ग नाही की टक्केवारी घेऊन मोकळे झाले ? अशी शंका देखील व्यक्त केली जात आहे. काही का असेना हा पूल लवकरात लवकर पूर्ण करून परभणी हिंगोली जिल्ह्याच्या जनतेची दळणवळणाची सोय लवकर करावी अशी मागणी सामान्य नागरीकातून वाढीस लागली आहे. तसेच या प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधित अधिकारी – कर्मचारी वर्गावर योग्य ती कारवाई करण्यात यावी,अशी मागणीही होत आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### सेलू नगर परिषदेकडून उत्कृष्ट देखाव्यांना पारितोषिकांची घोषणा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त उपक्रम

**सेलू,/प्रतिनिधी-** सेलू नगर परिषद व पोलिस प्रशासनाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सेलू शहरात काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीतील उत्कृष्ट देखाव्यांना पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

मंगळवार १४ एप्रिल रोजी होणाऱ्या मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या उत्कृष्ट देखाव्यांना प्रथम पारितोषिक ११ हजार रुपये, सन्मानचिन्ह व पोलिस प्रशासनाचे प्रशस्तीपत्र, द्वितीय पारितोषिक ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, तसेच तृतीय पारितोषिक ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे.

सेलू शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त निघणाऱ्या मिरवणुकीत विविध मंडळांकडून सादर करण्यात येणाऱ्या देखाव्यांचे परीक्षण समितीमार्फत मूल्यांकन करून विजेत्यांची निवड करण्यात येणार आहे, अशी माहिती नगराध्यक्ष मिलिंद सावंत, पोलिस उपअधीक्षक दीपक वाघमारे, पोलिस निरीक्षक दीपक बारसे यांनी दिली असून, मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी होऊन आकर्षक व वैचारिक देखावे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### सोनपेठेत महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; १२५० रुग्णांची तपासणी : १४० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड : शिबिरात २० जणांचे रक्तदान

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** येथील दीपस्तंभ प्रतिष्ठान व हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच कै. राजेभाऊ दादाराव कदम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य महाआरोग्य शिबिराला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. शुक्रवारी पार पडलेल्या या शिबिरात तालुक्यातील एकूण १२५० रुग्णांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह येथे आयोजित या शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष परमेश्वर कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. मुंजाभाऊ धोंडगे, लक्ष्मण धोंडगे, जयप्रकाश बचाटे, मुख्याधिकारी रामप्रसाद यादव, गटनेते हाजी सद्दाम हुसेन, अजय देशमुख, नगरसेवक विश्वजीत कदम, रहेमान सौदागर, जनार्धन झिरपे, शुभम कदम, अक्षय कदम, संतोष अंबुरे, खदिर अंसारी, दत्ता पांढरे, लक्ष्मीकांत कांदे, मारोती रंजवे तसेच शहर परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाद्वारे विविध आजारांवर रुग्णांना मार्गदर्शन व औषधोपचार करण्यात आले. यामध्ये नेत्र तपासणीसाठी ५९०, हाडांच्या तपासणीसाठी ३२०, दमा व श्वसनविकारांसाठी १५०, कान-नाक-घसा तपासणीसाठी १३० तर लहान मुलांच्या तपासणीसाठी ४० रुग्णांनी लाभ घेतला. याचबरोबर रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले.

शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे तपासणीनंतर १४० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून, कॅन्सर, किडनी विकार, मणक्याचे आजार व इतर गंभीर आजार असलेल्या ४२ रुग्णांच्या पुढील उपचारांचे नियोजन करण्यात आले आहे. या सर्व शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### बोरी व चारठाणाकरांचा अप्पर तहसील कार्यालय स्थापनेकरीता आग्रह : जिंतूर तालुक्यात अपर तहसील कार्यालय स्थापनेकरीता बैठक : लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मांडली मते

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील बोरी व चारठाणा येथील ग्रामस्थांनी शुक्रवारी अप्पर तहसील कार्यालय स्थापने संदर्भात आयोजित केलेल्या बैठकीत आपआपल्या गावांचा आग्रह धरला.

परभणी जिल्ह्यात सुधारित आकृतीबंधात जिंतुर तालुक्यातील बोरी / चारठाणा अपर तहसील कार्यालय निर्माण करण्याच्या अनुषंगाने शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, सेलूचे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, जिंतूर तहसिलदार शितल कच्छवे आदींसह जिंतुर तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच तथा प्रशासक ग्रामपंचायत कार्यालय, नागरिक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी उपस्थित मान्यवर व नागरिकांचे अभिप्राय संयमाने ऐकून घेतले. त्यांनी नमूद केले की, प्रस्तावित निर्णय घेताना स्थानिक नागरिकांची सोय, आवश्यकता तसेच सर्व संबंधित घटकांच्या भावना यांचा विचार करण्यात येईल. तसेच बैठकीत मांडण्यात आलेल्या सर्व मागण्या शासनास सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रारंभी अपर तहसील कार्यालय कुठे स्थापन करावे, याबाबत उपस्थित नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी आपापली मते मांडली. काहींनी बोरी येथे कार्यालय व्हावे, तर काहींनी चारठाणा येथे व्हावे, अशी मागणी केली. यामुळे या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

### परशुराम जन्मोत्सवानिमित्त १९ एप्रिलला परभणीत भव्य शोभायात्रेचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** भगवान श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त रविवारी १९ एप्रिल रोजी शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सार्वजनिक भगवान श्री परशुराम जन्मोत्सव समितीने दिली.

या शोभायात्रेस शनिवार बाजारातील श्री रेणूकामाता मंदिर येथून सायंकाळी ५ वाजता प्रारंभ होणार असून समारोप स्टेशन रस्त्यावरील श्री लक्ष्मीनारायण मंदिर येथे होणार आहे. या शोभायात्रेत भगवान श्री परशुराम यांचा भव्य रथ आणि पालखी हे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. तसेच गोमाता पूजन, गोवंश संवर्धन व संरक्षण या विषयांवर सजीव देखावे सादर केले जाणार आहेत. यासोबतच गोहत्या बंदी कायद्याबाबत जनजागृती, लाठी-काठी खेळांचे प्रात्यक्षिक, फेटाधारी महिला पथक, वैदिक गुरुकुलातील विद्यार्थ्यांकडून मंत्र व वेद पठण, पारंपरिक हलगी पथक आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांचा समावेश असणार आहे. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांसाठी आमरस-पुरीचा महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे.

दरम्यान, दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उत्सव उत्साहात साजरा होत असून, या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पावन उत्सवात कुटुंबीय व मित्रपरिवारासह सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन सार्वजनिक भगवान श्री परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली सेलूत ९७ लाखांची महाफसवणूक !
# निवृत्त शिक्षकाला अटकची भीती दाखवून सायबर टोळीचा डाव यशस्वी

**सेलू,/प्रतिनिधी -** सायबर गुन्हेगारीचे जाळे दिवसेंदिवस अधिक भयानक रूप धारण करत असल्याचे धक्कादायक उदाहरण सेलू येथे समोर आले आहे. अज्ञात सायबर टोळीने 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली एका निवृत्त शिक्षकाला खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवत तब्बल ९७ लाख ८३ हजार रुपयांची फसवणूक केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.

मौलाना आझाद नगर येथील नागनाथ शंकरराव कुरमुडले (वय ७०) यांना ४ मार्च ते ८ एप्रिल दरम्यान सतत मोबाईल कॉल व व्हॉट्सॲप व्हिडिओ कॉल करून जाळ्यात अडकवण्यात आले. आरोपींनी स्वतःला पोलीस, तपास अधिकारी व सरकारी यंत्रणेतील अधिकारी असल्याचे भासवून, त्यांच्या नावाने मुंबईत बँक खाते उघडून आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे खोटे सांगितले.

अटकची भीती, पेन्शन बंद करण्याची धमकी... सायबर गुन्हेगारांनी कुरमुडले यांना तात्काळ अटक होणार असल्याची भीती दाखवली. तसेच ही माहिती कुणालाही सांगितल्यास पेन्शन बंद होईल व मुलाची नोकरी जाईल, अशी धमकी देत मानसिक दबाव निर्माण केला.

मोडली, कर्ज घेतले, दागिने गहाण... भीतीच्या छायेत अडकलेल्या दाम्पत्याला पोस्टातील फिक्स्ड डिपॉझिट मोडणे पेन्शनवर कर्ज घेणे घरातील सोन्याचे दागिने गहाण ठेवणे यासाठी भाग पाडण्यात आले. त्यानंतर विविध बँक खात्यांमध्ये व चेकद्वारे टप्प्याटप्प्याने ९७.८३ लाख रुपये वर्ग करण्यात आले.

गुन्हा दाखल, पोलिसांची तांत्रिक तपासणी सुरू... याप्रकरणीसेलूपोलीसठाण्यात कलम ३१६(२), ३१८(४), ३५१(२)(३),६१(२)तसेच कलम ६६() व ६६() अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि पुंगळे तपास करत असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी मोबाईल क्रमांक व तांत्रिक माहितीचे विश्लेषण सुरू आहे.

नागरिकांसाठी इशारा सायबर पोलिसांनी स्पष्ट केले आहे की 'डिजिटल अरेस्ट' नावाचा कोणताही कायदेशीर प्रकार अस्तित्वात नाही.

पोलीस, , नावाने येणारे असे कॉल पूर्णपणे फसवे असतात.

कोणतीही वैयक्तिक किंवा बँक माहिती शेअर करू नये

संशयास्पद कॉल आल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.

परिसरातील सर्वात मोठ्या फसवणुकींपैकी एक... सेलूतील ही घटना आतापर्यंतच्या मोठ्या सायबर फसवणूक प्रकरणांपैकी एक मानली जात असून, नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे.



## राज्यमंत्री यांच्या वाढदिवसा निमित्त महिला मोर्चाकडून दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**जिंतूर । प्रतिनिधी-** राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना दीदी साकोरे-बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त जिंतूर येथील श्री संत पाचलेगावकर महाराज निवासी अस्थिव्यंग विद्यालयात महिला मोर्चाच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, खाऊ वाटप करण्यात आले तसेच शाळेला पंखा भेट देण्यात आला.

या प्रसंगी विद्यार्थ्यांसमवेत साधेपणाने वाढदिवस साजरा करण्यात आला. महिला मोर्चाच्या अध्यक्षा वैष्णवी कुलकर्णी, आशाताई खिल्लारे, डॉ. पंडित दराडे, यांच्यासह चंद्रकांत बहिरट, राजेश राठोड, सुमेर सूर्यवंशी, बंटी निकाळजे, पत्रकार सचिन रायपत्रीवार, मुक्ता हराळ, पूजा बेले, यांच्या उपस्थितीत तसेच शाळेचे मुख्याध्यापक एस. एस. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सूत्रसंचालन ज्ञानेश्वर राठोड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गवई आर. बी., आर. आर. चापके, राहुल घनसावत, लांडगे, सौ. छाया वाठोरे, जी. जी. भुकतर, संजीवनी केसवे, वडकुते व्ही. एफ. यांनी सहकार्य केले.

समाजोपयोगी उपक्रमातून राज्यमंत्री मेघनादिदी यांचा वाढदिवस महिला मोर्चाच्या वतीने साजरा करण्यात आला.

## भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भरगच्च कार्यक्रम

**जिंतूर,/प्रतिनिधी- :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ११ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान विविध सांस्कृतिक व व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दिनांक ११ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भीम गीत कव्वाल गायक रुक्मान ताज आणि संच अकोला यांचा भीम गीताचा जल्लोष कार्यक्रम या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून माजी आमदार विजयराव भांबळे तर उद्घाटक म्हणून सुरेश भैया नागरे यांची उपस्थिती असून स्वागताध्यक्ष रामराव उबाळे लक्ष्मणराव बुधवंत,केशवराव बुधवंत, हे उपस्थित होते.

१२ एप्रिल रोजी आंबेडकर सांस्कृतिक चळवतील युवा गायिका निकिता बंड आणि टीम स्वरांजली यांचा भीम गीताचा समाज प्रबोधन पर दणदणीत कार्यक्रम साजरा झाला असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबाजानी खा साब तर उद्घाटक म्हणून सिद्धार्थ हत्तीहंबीरे तर स्वागताध्यक्ष शेख इस्माईल सलीम पैलवान,नागसेन भेरजे यांची उपस्थिती होती. तर आज १३ एप्रिल रोजी राष्ट्रीय प्रबोधनकार व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक विशाल कुमार आणि संच मुंबई यांचा समाज प्रबोधन पर भीम गीताचा बहादार कार्यक्रम असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षा पालकमंत्री मेघना बोर्डीकर तर उद्घाटक म्हणून जिल्हा परिषद



अध्यक्षा लता विजयकुमार वाकळे सह सभापती गंगाधर बोर्डीकर, नगराध्यक्ष प्रताप भैया देशमुख तर स्वागत अध्यक्ष म्हणून सुरेश भुमरे,सचिन गोरे गोविंद थिटे, यांची उपस्थिती लाभणार आहे.

वरील सर्व सांस्कृतिक कार्यक्रम सायंकाळी आयोजित केले आहे.

तर उद्या १४ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता सुप्रसिद्ध व्याख्याते प्राध्यापक डॉ. प्रवीण कनकुटे यांचे आजचे लोकशाही व अनुयायांची जबाबदारी या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित केले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आनंदराव जाधव तर कार्यक्रमाचे उद्घाटक आनंदराव भरोसे स्वागता अध्यक्ष म्हणून गणेश काजळे पाटील व माजी आमदार हरिभाऊ लहाने काका यांचे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती तहसीलदार शितल कच्छवे, शासकीय तंत्रनिकेतन प्राचार्य गिरीश कानडे,पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, मुख्याधिकारी उमेश ढाकणे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आबासाहेब जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय मस्के,गट शिक्षणाधिकारी पोले, आदींची उपस्थित राहणार आहेत. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक निघणार आहे. अशी माहिती सार्वजनिक जयंतीचे अध्यक्ष गुणीरत्न वाकोडे उपाध्यक्ष कर्मवीर घनसावद सचिव बलवान वाकळे, कोषाध्यक्ष लखन खिल्लारे,कार्याध्यक्ष गणेश काकडे आदींनी केले आहे.

## महिलांनी राजकारणात मोठया संख्येने सहभागी व्हावे-सौ.मनिषा पारवे

**जिंतूर,/प्रतिनिधी-** भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही मानली जाते. परंतु या लोकशाहीत महिलांचा राजकीय सहभाग अपेक्षेपेक्षा कमी राहिला आहे. आजही लोकसभेत महिलांचे प्रतिनिधित्व सुमारे १५% इतकेच आहे, तर जगातील इतर देशांमध्ये हे प्रमाण खूप जास्त आहे उदाहरणार्थ, रवांडा मध्ये ६१% व स्वीडन मध्ये ४६% महिला संसदेत आहेत. या पार्श्वभूमीवर नारी शक्ती वंदन अधिनियम २०२३ हा महिलांच्या राजकीय सक्षमीकरणासाठी एक क्रांतिकारी पाऊल आहे. हा कायदा केवळ आरक्षणाचा नाही तर महिलांना 'नीतीची निर्माती' बनविण्याचा मार्ग आहे.



महिलांच्या नेतृत्वामुळे भ्रष्टाचार कमी होण्याची, पारदर्शकता वाढण्याची व सामाजिक न्याय प्रस्थापित होण्याची शक्यता आहे.तरुण मुलींना राजकारणात येण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.भारतीय महिलांमध्ये कोणत्याही गोष्टीचे आर्थिक नियोजन व नेतृत्व करण्याचे अंगीकृत गुण व क्षमता असते, त्यामुळे हे विधेयक महिलांसाठी देशाच्या आर्थिक व सामाजिक निर्णय प्रक्रियेत संधी मिळण्यासाठी महत्वाचा ऐतिहासिक निर्णय आहे. नारी शक्ती वंदन अधिनियम २०२३ हा भारतीय लोकशाहीसाठी एक ऐतिहासिक व निर्णायक टप्पा आहे.

महिलांना ३३% आरक्षण देऊन त्यांना राजकीय निर्णयप्रक्रियेत समान संधी दिली जात आहे. हा कायदा केवळ महिलांच्या हक्कांचा विजय नाही तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा पाया आहे. २०२९ पासून जेव्हा महिलांचे प्रतिनिधित्व प्रत्यक्षात वाढेल, तेव्हा भारतीय लोकशाही अधिक समतोल, न्याय्य व सशक्त होईल. म्हणूनच हा अधिनियम संपूर्ण समाजाने उत्साहाने स्वीकारावा व महिलांच्या राजकीय सहभागाला प्रोत्साहन द्यावे.



**परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकर व साकोरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देताना परभणीचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच जिंतूरचे डीएसपी, परभणी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सेलूचे उपजिल्हाधिकारी शैलेश लाहोटी यांनी परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्यमंत्री यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व पुढील आयुष्य आनंदाचे जावो हीच त्यांनी प्रार्थना केली.**

## धाडसी चोरीने सेलू तालुका हादरला! गुगळी-धामणगाव मार्गावर बार फोडून लाखोंचा मद्यसाठा लंपास; पोलिसांवर प्रश्नचिन्ह

**सेलू ,/प्रतिनिधी:** तालुक्यातील गुगळी-धामणगाव येथील गजबजलेल्या मुख्य रस्त्यावर चोरट्यांनी थरारक धाड टाकत जान्वी बार ॲन्ड रेस्टॉरंट फोडून तब्बल ३ लाख ७५ हजार ६०० रुपयांचा मद्यसाठा लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बारचे मालक कारभारी काटकर यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, २ एप्रिल २०२६ रोजी रात्री १० वाजता बार बंद करून कर्मचारी घरी गेले. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी १०.१५ वाजता मॅनेजर संदीप बनसोडे बार उघडण्यासाठी आले असता शटरचे लॉक तुटलेले दिसून आले. हा प्रकार लक्षात येताच तात्काळ मालकाला व पोलिसांना माहिती देण्यात आली. चोरट्यांनी अत्यंत शिताफीने विविध नामांकित ब्रँडच्या दारूच्या बाटल्यांवर हात साफ करत मोठा आर्थिक फटका दिला आहे. विशेष म्हणजे, ही चोरी पूर्णपणे नियोजनबद्ध पद्धतीने आणि कोणतीही



चाहूल लागू न देता पार पाडण्यात आली असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

मुख्य रस्त्यावर चोरी, पोलिस गस्त कुठे? गुगळी-धामणगाव हा पाथरी ते सेलू दरम्यानचा अत्यंत वर्दळीचा मार्ग असूनही अशा प्रकारची घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळेस पोलीस गस्त, सीसीटीव्ही यंत्रणा आणि गुप्त माहिती यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर आता थेट प्रश्न उपस्थित होत आहेत.

''ही केवळ चोरी नाही, सुरक्षाव्यवस्थेचे अपयश!'' स्थानिक नागरिक आणि व्यापाऱ्यांच्या मते, ''अशा पद्धतीने मुख्य रस्त्यावर चोरी होणे म्हणजे चोरट्यांचे धाडस वाढल्याचे लक्षण असून, पोलीस यंत्रणा निष्क्रिय असल्याचे स्पष्ट होते.''

पोलीस तपास सुरू दरम्यान, सेलू पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे. गुगळी-धामणगाव येथील ही घटना केवळ एक चोरी नसून, स्थानिक कायदा-सुव्यवस्थेला दिलेले उघड आव्हान ठरत आहे. आता पोलिस यंत्रणा किती लवकर आणि प्रभावी कारवाई करते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

दरम्यान या वाढत्या चोऱ्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना आपले तसेच आपल्याकडे असलेल्या मौल्यवान वस्तुंचे जतन कसे करावे हा एक मोठा आता त्यांच्यासमोर पुढे उभे टाकला आहे.

# बारा गाड्या ओढून नवस फेडत मुकुंदवाडी भवानी यात्रेला उत्साहात सुरुवात

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते उदघाटन ; भवानी मातेच्या जयघोषात हजारो भाविकांची उपस्थिती





तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. ११** | गेल्या २५४ वर्षांपासून मुकुंदवाडी येथील श्रीक्षेत्र लक्ष्मीदेवी व बालाजी मंदिर संस्थानच्या वतीने आयोजित तुळजाभवानी माता यात्रेस परंपरेनुसार बारा गाड्या ओढून नवस फेडत उत्साहात सुरुवात झाली. बारा गाड्या सोहळ्याचे उदघाटन गावातील जेष्ठ गावकऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. आमदार नारायण कुचे यांच्यासह गावातील ३० नवसकऱ्यांनी भावपूर्ण श्रद्धेने आपला वंश परंपरागत तसेच कबूल केलेला नवस फेडला. यावेळी हजारो भाविकांनी भवानी मातेचा जयघोष केला. समस्त मुकुंदवाडी भवानी यात्रा उत्सव समिती तसेच ग्रामस्थांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

१३ एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या यात्रेत भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात पारंपरिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश आहे. बारा गाड्या सोहळ्यात गावातील जेष्ठ देविदास जगताप, गंगाधर गायकवाड, साळूबा ठुबे, सुखदेव शिंदे, शेषराव ठुबे, रघुनाथ शिंदे, लक्ष्मण राते, पंढरीनाथ शिंदे, तुकाराम राते, उत्तमराव जगताप, भाऊलाल साळवे यांच्यासह गावकरी, तरुण मंडळी, महिला पुरुष भक्तांची व भवानी माता यात्रा उत्सव समितीची उपस्थिती होती. यावेळी गावातील भक्तांनी रेवड्या उधळून बारा गाड्यांचे स्वागत केले. गाड्या ओढण्यासाठी गावातील तरुणांची मोठी गर्दी दिसून आली. तर लहान मुले, महिला पुरुषांनी या बारा गाड्यावर फुलांची उधळण करून नवस करणाऱ्यांचे मोठ्या श्रद्धेने स्वागत केले.

चौकट...

यांनी फेडला नवस....

भवानी मातेच्या यात्रेत कबूल केलेला नवस मोतीलाल कुचे, रामदास कुचे यांनी गळ टोचला तर आमदार नारायण कुचे, नगरसेवक सुनील जगताप, अमोल जगताप, संदिप शिंदे, पप्पूराज ठुबे, ज्ञानेश्वर शिंदे, सत्येश्वर शिंदे, शेरू गायकवाड, बंडू गुळे, सोनू दहीहंडे, सचिन खोतकर, किरण गायकवाड, ज्ञानेश्वर लामदांडे, राहुल लामदांडे, जनार्दन भुसारे, युवराज रोकडे, गजानन गुळे, शिवराज म्हस्के, सागर जगताप, रतन साळवे, पवन गायकवाड, देवेश राते, सुभाष लामदांडे, बाबासाहेब करजुले, सचिन जऊक, उमेश साळुंके, संतोष जगताप, अजय जगताप, राधाकृष्ण गुळे, यांनी बाऱ्या गाड्या ओढून भवानी मातेचा नवस फेडला.

रात्री रंगला भंदे, व देवींची भव्य मिरवणूक...

मुकुंदवाडी भवानी मातेची भव्य मुरवणूक रात्री काढण्यात आली. यावेळी विविध सोंग घेऊन भाविकांनी सजीव देखावे सादर केले. तर पारंपरिक वाद्य आणि गाण्याच्या तालावर ठेका धरत भवानी भक्तांनी जल्लोष केला.

पहाटेपर्यंत रंगला गोंधळ, छंदबाजी, कलगीतुरा....

भवानी मातेच्या यात्रेमध्ये पारंपरिक गाणी, वाद्य यासाह विविध गोंधळ छंदबाजी आणि कलगी तुऱ्याला महत्व आहे. पहाटे पाच वाजेपर्यंत सवाल जवाबाचा कलगी तुरा रंगला. तुनतुना, हलगी, संबळ टाळ, मृदूंग, यासह संबळ वाद्यातून भवानी मातेच्या यात्रेत जुन्या गाण्याचा आवाज निनादला.

दुकाने, खाद्य पदार्थ, पूजा साहित्याची दुकाने सजली...

भवानी मातेच्या या यात्रेमध्ये कुस्ती मैदान, विविध खेळणी, विविध वस्तूंची दुकाने, उपहार गृह, पूजा साहित्य विक्रीची दुकाने सजलेली पाहायला मिळाली. यात्रेमध्ये लागलेल्या लहान मोठ्या दुकानांमध्ये सायंकाळी महिला तरुणी यांच्यासह राज्यभरातून आलेल्या भाविक भक्तांची गर्दी पाहायला मिळाली.

आज जाहीर कीर्तन व महाप्रसाद...

रविवार, दिनांक १२ एप्रिल रोजी सायंकाळी ४ ते ५ वाजता महाप्रसादाचे आयोजन भवानी माता मंदिर येथे आयोजित करण्यात आले असुन रात्री ८ ते १० वाजेदरम्यान हभप शिवांजलीताई जरांगे पाटील यांचे जाहीर कीर्तन होईल.

उद्या कुस्त्यांची भव्य दंगल....

भवानी माता देवीची यात्रा ही वंशपरंपरागत आयोजित केली जाते. या यात्रेत धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असते. येथे होणारे कार्यक्रम हे अंधश्रध्देला नव्हे, श्रध्देला महत्त्व देणारे आहेत, असे यावेळी मंदिर देवस्थान च्या वतीने सांगण्यात आले. यात्रेच्या तिसर्या दिवशी १३ एप्रिल रोजी दुपारी २ वाजेपासून कुस्त्यांची भव्य दंगल आयोजित करण्यात आली आहे. या दंगलीतील यशस्वितांना रुपये १० पासून रुपये ११ ते २ लाख ५१ हजार रुपयापर्यंत बक्षिस दिले जाणार आहेत. यंदाच्या कुस्त्यांच्या दंगली प्रसंगी देशातील नंबर १ चे पैलवान ट्रिपल उपमहाराष्ट्र केसरी पैलवान महेंद्र गायकवाड, दिल्ली येथील अंतरराष्ट्रीय भारत केसरी पैलवान अजय बारण, अकलूज येथील शिवनेरी तालीम चे पैलवान सतपाल सोनटक्के, आणि पुणे येथील आर्मी स्पोर्ट सेंटर चे पैलवान रोहित गुज्जर यांची उपस्थिती राहणार आहे. या भव्य कुस्ती दंगलीतील विजेत्या पैल्वानास चांदीची गदा देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात येणार आहे. समस्त भाविक-भक्तांनी भवानी माता यात्रा महोत्सवात आयोजित कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुकुंदवाडी गाव यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## फारोळा जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांची हजरी पटपडताळणी



तभा वृत्तसेवा

**बिडकीन दि ११** | पैठण शिक्षण विभागामार्फत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची हजरी पटपडताळणी करण्यात येत आहे, प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये राबविण्यात येत आहे जि.प.उच्च.प्रा.शाळा.फारोळा येथे ग्रामपंचायत अधिकारी .आशा तुपे यांनी भेट देऊन सर्व वर्गा मध्ये जाऊन पटपडताळणी केली यावेळी मुख्याध्यापिका स्वाती थिगळे, अपर्णा निकुंभ, शितल केजकर, अरविंद महाकाळे, वर्षाराणी कमळू,सुलभा शेळके, शितल शिरवत,प्रणाली भिलेगावकर, मिनाक्षी शिताळ, ज्योती जवणे,वर्षा नवगिरे,ज्योती खेडकर, सर्व शिक्षक उपस्थित होते.

## आंबेडकर जयंती मिरवणुकीत भाविकांना त्रास होऊ नये; महापौरांचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर** | महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी निघणाऱ्या मिरवणुकीदरम्यान भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे निर्देश महापौर समीर राजूरकर यांनी दिले. आंबेडकर जयंती मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरीये, आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, सौ. कल्पिता पिंपळे, शहर अभियंता संजय कोंबडे, कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) अमोल कुलकर्णी, सौ. मोहिनी गायकवाड, विजय गोरे तसेच सर्व सहाय्यक आयुक्त व वॉर्ड अभियंते उपस्थित होते.

## ‘भागूबाई’ चित्रपटाचा पोस्टर रिलीज

**मुंबई** | गावातल्या गप्पा, अफवा आणि छोट्या-मोठ्या गोष्टींवर रंगणाऱ्या चर्चांमागचं खरं वास्तव हलक्या-फुलक्या आणि विनोदी शैलीत उलगडणारा ‘भागूबाई’ हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा पोस्टर रिलीज करण्यात आला असून, हा चित्रपट २४ एप्रिल २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.मोशन पोस्टरमध्ये ‘भागूबाई’ गमतीशीर अंदाजात दिसते. ओठांवर बोट ठेवून ‘श्श...’ असा इशारा करताना तिचा खोडकर स्वभाव अधोरेखित होतो. तिच्यामुळे गावात दोन गटांमध्ये पडलेली फूटही पोस्टरमध्ये दाखवण्यात आली आहे. या मोशन पोस्टरमुळे प्रेक्षकांची उत्सुकता आणखीच वाढली आहे.‘भागूबाई’ ही कथा आहे एका अशा बाईची, जिला गावातल्या गप्पा आणि कुचाळक्या करण्यात विशेष आनंद मिळतो. मात्र तिच्या आयुष्यात अचानक घडणारी एक अनपेक्षित घटना सगळंच चित्र पालटून टाकते.

## तुरुंगातील तो ट्रॅक माझ्यासाठी मानसिकदृष्ट्या थकवणारा : भरत अहलावत

झी टीव्हीवरील ‘जाने अनजाने हम मिले’ मालिकेत सध्या रीत (आयुषी खुराणा), राघवचा (भरत अहलावत) निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी लढा देत आहे. राघववर कीर्तीच्या खुनाचा खोटा आरोप असून, त्याला तुरुंगात शारीरिक आणि मानसिक छळाला सामोरे जावे लागत आहे. भरत अहलावतने सांगितले की, तुरुंगातील दृश्ये आणि पत्नी-बाळाची चिंता यांमुळे तो कलाकार म्हणून भावनिकदृष्ट्या थकला आहे, मात्र यामुळे त्याच्या अभिनयात परिपक्वता आली आहे.

## ह भ प भास्करगिरी महाराजांना मातृशोक



तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.१२** | श्रीक्षेत्र देवगड संस्थान, श्री गुरुदेव दत्त पिठाचे महंत परमपूज्य गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांच्या मातोश्री सरुबाई ज्ञानदेव पेसोडे यांचे आज रविवार दि. १२ /०४/२०२६ रोजी सकाळ ठीक६-१४ मी. वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी श्रीक्षेत्र देवगड संस्थान परिसरात सायंकाळी ४:३० वाजता करण्यात आला.

मृत्यू समयी त्यांचे वय ९९ वर्षे होते. सरूबाई ज्ञानदेव पेसोडे यांच्या पश्चात दोन मुले ह भ प भास्करगिरी महाराज व मधुकर पेसोडे व कन्या कमलबाई रायपुरे आहेत. सरुबाई ज्ञानदेव पेसोडे यांच्या दुःखद निधनाने देवगड परिसरातील नागरिकांवर तसेच भक्त परिवारावर शोककळा पसरली आहे.

## म.गां.रा.ग्रा.रो.अंतर्गत विविध योजनेतील लाभार्थ्यांना कुशल पेमेंट मिळण्यासाठी वृषाली मिरकर यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली 24 कोटींची मागणी



तभा वृत्तसेवा

**सिल्लोड प्रतिनिधी** | सिल्लोड येथील स्वस्तिक लॉन येथे जिल्हा परिषद अध्यक्ष श्री.अविनाश पाटील गलांडे यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती पी.एम.मिन्नू मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सिल्लोड पंचायत समिती अंतर्गत विविध विकास कामांचा आढावा घेण्यात आला यावेळी पंचायत समिती सदस्य वृषाली सुनिल मिरकर यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत घरकुल,वृक्ष लागवड,कुकुट पालन शेड,गाय गोठा शेड,शेळी शेड,वैयक्तिक सिंचन विहिरी,पेव्हर ब्लॉक,सिमेंट रस्ता,शेततळे,सार्वजनिक विहिरी,मातोश्री पानंदा रस्ता कुशल पेमेंट साठी २४ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करून विविध प्रश्न विचारू अधिकाऱ्यांची लक्ष वेधले असता सिल्लोड पंचायत समिती मध्ये जवळपास ११८० कामांची वेळोवेळी कुशल निधीची मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे त्यामध्ये PMAYG आवास योजनेला SNA स्पर्श प्रणाली लागू झाल्यामुळे हप्ता जमा होण्यास ४० ते ४५ दिवसा पेक्षा जास्त कालावधी लागत आहे त्यामध्ये ६२२ घरकुल लाभधारक भूमिहीन आहेत त्यांना प्रथम हप्ता देण्यास अडचणी येत आहे त्याबाबत शासनाने २५ मार्च २०२६ रोजीच्या अतिक्रमण नियमकुल करण्याचा जीआर काढलेला असून त्यात ग्रामपंचायत योग्य ती कारवाई करत नसल्यामुळे घरकुल लाभधारक यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे आपल्या स्तरावर ग्रामपंचायतीने कार्यवाही करण्यासाठी आपण योग्य त्या सूचना कराव्यात जवळपास १७१० कामांचे कुशल देयक नरेगा संकेतस्थळावर ऑनलाईन झालेले आहे निधी उपलब्ध करून दिल्यास संबंधित लाभार्थ्यांना कुशल बिल विविध मुदतीत वितरित करता येईल.

अशा विविध लाभार्थींच्या समस्या सोडविण्याची मागणी वृषाली सुनिल मिरकर यांनी केली. यावेळी भाजपा पक्षाचे जिल्हा परिषद व पंचायत समिती सभापती, जि प व पं स सदस्य अधिकारी कर्मचारी सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मिटमिटा झूलॉजिकल पार्कचे बांधकाम मान्सूनपूर्वी पूर्ण करा; प्लास्टिकला बंदी – आयुक्त अमोल येडगे यांचे निर्देश



तभा.वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. ११ एप्रिल** | मिटमिटा येथे उभारण्यात येत असलेल्या झूलॉजिकल पार्कचे सर्व कामे येत्या मान्सूनपूर्वी पूर्ण करावीत, तसेच पार्क परिसरात कोणत्याही प्रकारचे प्लास्टिक आणण्यास सक्त मनाई करण्यात यावी, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त श्री. अमोल येडगे यांनी दिले.

आज आयुक्तांनी मिटमिटा येथील झूलॉजिकल पार्कच्या कामाची पाहणी करून विविध बाबींवर सविस्तर सूचना केल्या. पार्कमध्ये प्राण्यांच्या जाती व वंशानुसार पायवाटांवर कलर कोडिंग करण्याचे निर्देश देताना, सिंह व वाघांसारख्या प्राण्यांच्या पिंजऱ्यांसमोर कॅट फॅमिलीचे ठराविक रंगसंगतीत पेंटिंग करावे, असे त्यांनी सांगितले.

पार्क परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून हिरवाई वाढविणे, तसेच पर्यटकांच्या सोयीसाठी बस सेवा व ई-कार्ट प्रणाली विकसित करण्याचे नियोजन करावे, असेही त्यांनी नमूद केले. याशिवाय विमानतळ, रेल्वे स्टेशन व बसस्थानक येथून झूलॉजिकल पार्कपर्यंत दिशा दर्शक फलक उभारणे आणि स्मार्ट सिटी बससेवेचे मार्ग निश्चित करण्याबाबतही त्यांनी सूचना दिल्या.

पार्कमधील पायवाटांच्या दोन्ही बाजूंना वृक्षलागवड करून परिसर अधिक आकर्षक करावा, तसेच ऊर्जा गरजा भागविण्यासाठी पवनचक्की प्रकल्प राबविण्याचे नियोजन करावे, असेही आयुक्तांनी सांगितले.

मान्सून पर्यंत बांधकाम संपूर्ण केल्यावर तद्नंतर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी आणि पुढच्या वर्षी वृक्ष वाढल्यावर प्राण्यांना आणण्याचा विचार करू, असे ते म्हणाले.

जून महिन्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबविण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

या पाहणीवेळी मुख्य उद्यान अधिकारी श्री. विजय पाटील, स्मार्ट सिटीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवींद्र जोगदंड, प्रकल्प अधिकारी श्री. इमरान खान, सौ. स्नेहा नायर तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## उन्हाच्या चटक्याबरोबर माठांच्या मागणीत वाढ; काळा,लाल,पांढरा माठाची मागणी



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.१२ एप्रिल** | शहराचे तापमान वाढत आहे.अशावेळी सामान्य नागरिकांना थंड पाण्याची ओढ लागलेली असते सोयगाव शहरासह तालुक्यात परिसरात माठ विक्रीसाठी आलेले माठ पाहायला मिळत आहेत.वाढत्या उन्हाळड्त थंड पाण्याची मागणी असते.फ्रिजमधील पाण्यात चव नसते. यामुळे नागरिकांडून माठांचीही मागणी वाढली आहे.

सोयगावतील आठवडी बाजारात विविध प्रकारचे माठ पाहायला मिळत आहेत.यामध्ये नागरिकांची जास्त मागणी काळ्या माठाला आहे.लाल माठ,पांढरा माठ, सोयगाव शहरासह ग्रामीण भागात आल्याचे चित्र दिसून येत आहे,सोयगाव शहरासह ग्रामीण भागात उन्हाळा जाणवत असल्याने रंगबेरंगी माठ विक्रेत्यांची मोठ्या प्रमाणावर विक्रीते दिसत आहेत.

यावर्षी माठांच्या किंमतीत म्हणावी तशी वाढ झाली नसल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. माठातील पाणी पिण्याचे फायदे माठ हा मातीचा बनलेला असतो. मातीमध्ये पाणी थंड ठेवण्याची नैसर्गिक क्षमता असते. त्यामळे माठातील पाणी नैसर्गिकरीत्या थंड राहते. मातीतील सूक्ष्म छिद्र पाण्यातील अशुद्धता काढून टाकण्यास मदत करतात. ज्यामुळे पाणी अधिक शुद्ध होते. उन्हाळ्यात माठातील पाणी पिल्याने उष्माघात टाळता येतो. सध्या उन्हाळा जाणवू लागल्याने आमच्या माठांना मागणी वाढली आहे, असे.माठ या विक्रेत्याने सांगितले.

**उन्हाळ्यात माठातील पाणी खूपच चांगले असते. फ्रीजमधील पाण्याने सर्दी, खोकल्याचा त्रास होतो. माठातल्या पाण्याने सर्दीचा त्रास कधीच होणार नाही. आमच्या विविध प्रकारचे माठ सध्या विक्रीसाठी उपलब्ध आहे. हा उन्हाळा अंत्यत कडक जाण्याची शक्यता असल्याने आम्ही मोठ्या प्रमाणावर माल स्टॉक करून ठेवला आहे**

**माठ विक्रेता,सोयगाव**

## वेरुळ घृष्णेश्वर विकास आराखड्यातील कामांचा जिल्हाधिकारी यांनी घेतला आढावा



**छत्रपती संभाजीनगर** | आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर वेरूळ घृष्णेश्वर विकास आराखड्यातील अंतर्भूत असलेल्या भक्तनिवास, शॉपिंग कॉम्प्लेक्स दर्शनबारी,रस्ते, पथदिवे , पाणी पुरवठा, शासकीय जमिनीवर अतिक्रमण काढण्याबाबत संबंधित यंत्रणेकडून आढावा घेतला . पोलीस उपविभागीय अधिकारी अपराजिता अग्निहोत्री ,सहाय्यक जिल्हाधिकारी, अंकिता ताकभाते,कन्नड उपविभागीय अधिकारी संतोष गोरड , उप वनसंरक्षक सुवर्णा माने, केंद्रीय पुरातत्व विभागाचे डॉ.शिवकुमार भगत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस. एस .भगत ,कार्यकारी अभियंता ,एस .जी केंद्रे ,विद्युत विभागाच्या कार्यकारी अभियंता अनघा पुराणिक ,भूमि अभिलेख कार्यालयाचे उपअधीक्षक चंद्रकांत सेवक,घृष्णेश्वर मंदिर ट्रस्टचे सचिव योगेश टोपरे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंदिर परिसरातील विकास कामाबरोबरच दर्शनबारी, शॉपिंग कॉम्प्लेक्स, भक्त निवासाचे काम दिलेल्या कालमर्यादेत पूर्ण करावे. जर हे काम कालमर्यादेत नाही झाले तर संबंधित कंत्राटदारावर यांच्याबाबत वाढीव निधी न देता कारवाई करण्याबाबतही निर्देशित करण्यात आले. नवीन रस्ते ,पाणीपुरवठा, वीज यंत्रणांची उर्वरित कामे त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी बैठकीत दिले. घृष्णेश्वर मंदिर परिसराची पाहणी करून विविध विकास कामाच्या अंतर्गत होत असलेल्या बांधकाम ,पुरातत्व विभागाअंतर्गत येणाऱ्या संरक्षित वास्तू आणि परिसराचा विकास करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला योग्य ते सूचना, निर्देश आणि सहकार्य करण्याबरोबरच वरिष्ठ पातळीवरून परवानगी मिळण्याबाबतही सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी पुरातत्त्व विभागाला केले . आगामी कालावधीत कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या विविध देशातील भक्तगण आणि नागरिकांना विविध सेवा सुविधा पुरवण्यासाठी घृष्णेश्वर विकास आराखड्यात विविध कामांचा समावेश केलेला आहे. सदरील काम पूर्ण करण्यासाठी, निविदा, कार्यादेश, तांत्रिक मान्यता व इतर अनुषंगिक निधीच्या उपलब्धतेची कार्यवाही तात्काळ मार्गे लावून काम पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

## श्री क्षेत्र नाथ आश्रम वेरूळ येथे समीर राजूरकर यांनी मच्छिंद्रनाथ भगवंताचे घेतले आशीर्वाद



तभा वृत्तसेवा

**खुलताबाद दि ११ एप्रिल** | वेरूळ येथील नाथ आश्रमात छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचे महापौर समीर भैया राजूरकर भाजपा नेते विकास भाऊ कुलकर्णी. यांनी नाथ आश्रम येथे चालू असलेल्या नाथ कथेसाठी भेट देऊन नाथ योगिनी साध्वी अक्का महाराज नाथ आश्रम प्रमुख यांच्याशी आश्रमातील भाविकासाठी वार्षिक कार्यक्रमाची माहिती घेतली व हजारो भाविकांसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध धार्मिक . नाथ कथा महाशिवरात्र दत्त जयंती उत्सव धर्मनाथ बीज यासह आलेल्या हजारो भाविकांसाठी भव्य मंडप अन्नदान स्वच्छ पाणी परिसरातील स्वच्छता पाहून समीर भैया राजुरकर समाधान व्यक्त करून घृष्णेश्वर मंदिर ट्रस्ट अध्यक्ष जि प सदस्य कुणाल ( विकी) दांडगे खुलताबाद पंचायत समितीची सभापती सुनिता संजय खंडागळे यांनी नियोजन कमिटीला धन्यवाद दिले. आलेल्या मान्यवरांचे गावचे सरपंच प्रकाश पाटील मिसाळ माजी सभापती विवेक बापू चव्हाण यांनी शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन आश्रमाच्या वतीने स्वागत केले याप्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे माजी सभापती दिनेश अंभोरे विकास कापसे संतोष गायकवाड ह भ प नारायण भांबर्डे संतोष करपे पाटील तुकाराम मते कैलास मिसाळ दामू अण्णा गवळी रमेश दादा ठोंबरे कल्पना कदम नाथ आश्रमा च्या वतीने प्रामख्याने उपस्थित होते.

# जगणे भेसळयुक्त होत आहे

## रोखठोक

**दिनेश गुणे**



ही जेमतेम दीड महिन्यापूर्वीची घटना आहे. आंध्र प्रदेशातील गोदावरी जिल्ह्यातील लालाचेवरू, चौंदेश्वरनगर, स्वरूपनगर या भागांत गेल्या फेब्रुवारी महिन्यात अचानक काही लोकांना वेगळाच आजार सुरू झाला. मळमळ, उलट्या, पोटदुखीमुळे अनेक जण बेजार झाले. अनेकांना मूत्रविसर्जनदेखील करता येईनासे झाले. काहींची मूत्रपिंडे निकामी झाली आणि या आजाराने जिल्हा हादरून गेला. गेल्या २२ फेब्रुवारी रोजी अशा काही तक्रारी सुरू झाल्या आणि रुग्णांची संख्या वाढू लागल्याने तपास यंत्रणा सतर्क झाल्या. सखोल चौकशी सुरू झाली आणि आजाराचे मूळ शोधण्यासाठी आरोग्य यंत्रणा कामाला लागल्या. याच परिसरातील एका दूध डेअरीमधून विकले जाणारे दूध आहारात वापरले गेल्याने या तक्रारी सुरू झाल्याचा प्राथमिक निष्कर्ष निघाला आणि या दुधाची तपासणी करण्यात आली. पूर्णान्न आणि आरोग्यरक्षक मानल्या जाणाऱ्या दुधामुळे अनेक जण अक्षरशः मृत्युशय्येवर पडले. २० हून अधिक लोकांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले. लहान मुले, वृद्ध, महिलांनाही या दुधाची बाधा झाली आणि १६ जण अक्षरशः तडफडून मरण पावले. एथिलिन गायकॉल नावाचा अँटी-फ्रिझ म्हणून वापरला जाणारा व मानवी आरोग्यासाठी अत्यंत अपायकारक असणारा विषारी पदार्थ दुधात मिसळला जात होता आणि या भेसळयुक्त दुधामुळे १६ जीव प्राणास मुकले, काही जण गंभीर आजाराशी कमालीचा संघर्ष करून कसाबसा तरले. १०० हून अधिक कुटुंबांच्या घरी त्या डेअरीमधून हे दूध वितरित केले जात होते. त्याचा आहारात वापर केलेल्या काहींना डायलिसिस द्यावे लागले, काही जणांची प्रकृती एवढी बिघडली की त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवावे लागले. या घटनेनंतर संपूर्ण देश हादरला. त्याआधी गेल्या वर्षी, जूनमध्ये उत्तर प्रदेशातील आग्रा येथे भेसळयुक्त दूध प्यायल्याने दोन निष्पाप बालकांचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आल्यावर प्रशासनाने आग्रा बाह्य रस्त्यावरच दुधाची वाहतूक करणारा एक टँकर जप्त केला आणि तब्बल पाच हजार लिटर भेसळयुक्त दूध रस्त्यावर ओतून दिले. असाच एक प्रकार गेल्या वर्षी मे महिन्यात महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात उघडकीस आला होता. सोलापूर जिल्ह्यातील एका गावातील शीतकरण केंद्रातून गाईचे दूध घेऊन कोल्हापूरकडे निघालेल्या पाच टँकरमध्ये भेसळयुक्त दूध असल्याची खात्रीशीर माहिती अन्न व औषध प्रशासनास मिळाली आणि वाटेतच टँकर अडवून दुधाची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये भेसळ असल्याचे निष्पन्न झाल्यावर पाचही टँकरमधील सुमारे ७५ हजार लिटर दूध ओतून नष्ट करण्यात आले. जळगावच्या धरणगाव तालुक्यातील भवरखेडे येथे घातक रसायनांपासून बनविलेल्या दुधाची विक्री होत असल्याची खबर मिळाल्यावर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने कारवाई करून बनावट दूध तयार करणाऱ्या एका तरुणास अटक केली. गेल्या जुलै महिन्यातील या कारवाईत सुमारे ८० लिटर बनावट दूध नष्ट करण्यात आले, पण तोवर असे किती दूध विकले गेले असेल आणि किती जणांनी भेसळयुक्त दूध पूर्णान्न म्हणून आहारात वापरले असेल या भीतीने गाव गोठले असेल यात शंका नाही. जळगाव जिल्ह्यात अनेक ठिकाणी बनावट दूध तयार करण्याचा उद्योग चालत असल्याचे बोलले जाते. अनेक ठिकाणी खाजगी दूध संकलन केंद्रांतील दुधाचे नमुने तपासणीसाठी घेतल्यानंतर कारवायाही करण्यात आल्या होत्या. तरीही भेसळीचे आणि बनावट दुधाचे संकट सरल्याची खात्री नागरिकांना नाही.

तेल, चुना, रसायने, शाम्पू, साबण, बोरिक ॲसिड, युरिया, स्टार्च, हायड्रोजन पॅराक्साईड यासारख्या आरोग्यास अपायकारक असलेल्या पदार्थांचा वापर करून बनावट दूध तयार करण्याचे कारखाने जागोजागी फोफावल्याच्या बातम्या गेल्या अनेक वर्षांपासून सतत कानावर आदळत असतात. आग्रा येथे दोन बालकांचा मृत्यू झाल्यावर पुन्हा एकदा त्या बातम्यांनी डोके वर काढले. यापैकी काही रसायने एवढी घातक असतात की त्यामुळे कर्करोगासारखे आजारही बळावू शकतात, शरीरातील पेशींचे नुकसान होते आणि आनुवंशिकतेच्या गुणात्मकतेलाही बाधा येऊ शकते, असे अनेक संशोधनांतून स्पष्ट झाले आहे. मात्र, अजूनही, दूध हे पूर्णान्न असल्याची सार्वत्रिक समजूत श्रद्धेने जोपासली जाते. भेसळयुक्त पदार्थ तयार करणे, ते बाजारपेठेत आणणे आणि ग्राहकाच्या माथी मारणे ही जीवघेणी अनैतिक व्यापारनीती केवळ दुधासारख्या एकाच पदार्थापुरती मर्यादित राहिलेली नाही. आरोग्यास पोषक मानल्या जाणाऱ्या दुधापासून ते आरोग्यास अपायकारक असलेल्या दारूपर्यंत सर्वत्र भेसळीच्या धंद्याचा उच्छाद सुरू असल्याने, कोणत्याही वस्तूच्या नैसर्गिक शुद्धतेवर डोळे झाकून विश्वास ठेवावा अशी हमी देणे सामान्य समाजास अशक्य होऊ लागले आहे. दोन-चार दिवसांपूर्वी गुजरातमधील अहमदाबादेत चांदखेडा परिसरात एका कुटुंबाने तयार डोश्याचे पीठ विकत आणले. घरच्या घरी बनविलेला डोसा आरोग्यास चांगला असतो या विश्वासाने तो खाल्ल्यावर सर्वांना अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि अन्न विषबाधेची सारी लक्षणे दिसू लागली. उपचार सुरू झाले, पण कुटुंबातील दोन बालके मात्र हे विष पचवू शकली नाहीत. उपचार सुरू असतानाच त्यांनी प्राण सोडला. यातील एका बालिकेने जेमतेम काही महिन्यांपूर्वी जगात प्रवेश केला होता. उघड्या डोळ्यांनी जग पाहण्याआधीच तिला जगाचा निरोप घ्यावा लागला. तिच्या आईने डोसा खाल्ल्यानंतर स्तनपान दिल्याने तिचा मृत्यू झाला असावा असे सांगितले जाते. अन्नातील भेसळीचे हे अंगावर शहारे आणणारे जीवघेणे उदाहरण आहे.

दोन-चार वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशातील मेरठमध्ये नवरात्रीचा उत्सव साजरा करताना भेसळयुक्त कुट्टू पिठाचे सेवन केल्याने सुमारे दीडशे जणांना विषबाधा झाली, तर हरयाणाच्या सोनीपतमध्ये तीन वर्षांपूर्वी गव्हाचे भेसळयुक्त पीठ खाल्ल्याने एक जण मरण पावला. अलिकडे तांदूळही नकली मिळत असल्याची भीती व्यक्त होत असते आणि अंड्यांच्या शुद्धतेवरही प्रश्नचिन्हे उमटत असतात. नकली मिठाने बाजारात शिरकाव केल्याच्या भीतीने अनेक जण धास्तावले आहेत. स्वयंपाकघरात वापरल्या जाणाऱ्या लाल तिखट व हळदीमध्ये रासायनिक रंगाची भेसळ, काळेमिरीमध्ये पपईच्या वाळलेल्या बियांची भेसळ, दुग्धजन्य पदार्थांपासून बनविल्या जाणाऱ्या मिठाईमध्ये मैदा वा अन्य रासायनिक पदार्थांची भेसळ, जीव वाचविण्यासाठी आणि आरोग्याच्या समस्यांपासून मुक्ती मिळविण्यासाठी घ्यावयाच्या औषधांमध्येही भेसळ आणि पिकांचे पोषण व्हावे यासाठी वापरल्या जाणाऱ्या खतामध्येही भेसळ आढळू लागल्याने, जगाचे अवघे जगणे भेसळयुक्त होऊ लागले असून, ज्याचे सेवन जगण्यासाठी करावे त्यापैकी काहीही मरणास कारणीभूत ठरू शकते या भीतीचे वास्तविक रूप आता दिसू लागले आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये गुजरातच्या नडियाद नावाच्या गावात पाच जणांचा संशयास्पद मृत्यू झाला. अचानक झालेल्या या दुर्घटनेचा तपास करताना पोलिसही चक्रावून गेले आणि मृत्यूच्या कारणाचा शोध लागला. मिथाईल अल्कोहोल नावाचा विषारी पदार्थ मिसळलेले भेसळयुक्त आयुर्वेदिक औषध घेतल्याने हे मृत्यू झाल्याचे उघडकीस आले. कोविड महामारीच्या संकटात जेव्हा प्रत्येक जण जीव वाचविण्यासाठी जिवाचे रान करत होता, तेव्हा काही भेसळखोरांच्या टोळ्या मात्र या आजारापासून बचाव करणारे औषध समजले जाणाऱ्या रेमडेसिविर नावाच्या इंजेक्शनच्या रिकाम्या कुप्यांमध्ये पाणी घालून विकण्याचा धंदा करत होते. उत्तर प्रदेशातील लखनौमधील रक्तपेढ्यांमध्ये उघडकीस आलेला प्रकार तर भयावह आहे. येथील काही रक्तपेढ्यांमधील रक्त मानवी शरीरासाठी घातक असल्याचे अन्नसुरक्षा प्रशासनाने एका अहवालाद्वारे उघड केले आणि लखनौवासीयांची झोप उडाली. एक मोठी टोळी संघटितपणे उत्तर प्रदेशातील अनेक गावांत भेसळयुक्त रक्ताचा धंदा करत असल्याचा पोलिसांचा अंदाज होता. त्यानंतर लखनौमध्ये काही रक्तपेढ्यांवर धाडी घालण्यात आल्या आणि तेथील रक्त भेसळयुक्त असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणाचे धागेदोरे राजस्थानापर्यंत पोहोचल्याचेही तपासात निष्पन्न झाले होते. काही रक्तपेढ्यांना सलाईनचे पाणी मिसळलेल्या भेसळयुक्त रक्ताच्या पिशव्या स्वस्त किमतीस विकल्या जात होत्या, असेही स्पष्ट झाले. असे भेसळयुक्त रक्त रुग्णाच्या शरीरात गेल्यास संसर्ग पसरून काही तासांतच रुग्ण दगावतो, असे या क्षेत्रातील जाणकारांनी तेव्हा स्पष्ट केले होते. सोडियम क्लोराईड मिसळलेले सलाईनचे पाणी मिसळून रक्त दुप्पट करण्याचा हा मानवी जिवाशी खेळण्याचा अघोरी आणि अमानवी प्रकार म्हणजे, भेसळीच्या विकृत धंद्याचे थेट उदाहरण आहे.

अन्नपदार्थांतील भेसळ हा अनेक दशकांपासून होत असलेला अनैतिक आणि अमानवी व्यवहार आहे. जगभर अनेक देशांत अन्न भेसळीच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. रेस्टॉरेंटमधील फ्रायर्स, ग्रीस ट्रॅप्स आणि कत्तलखान्यातील कचऱ्यातून काढलेले किंवा टाकून दिलेल्या प्राण्यांच्या अवयवांपासून काढलेल्या अवैध खाद्यतेलाचा घोटाळा चीनमध्ये गाजला होता. तैवान, हाँगकाँग आणि सिंगापूरमध्येही अशी दूषित अन्न उत्पादने आढळली. २०१३ मध्ये, इराणमध्ये मिथेनॉलमुळे ६९४ जणांना विषबाधा झाली आणि आठ जणांचा मृत्यू झाला. २०१८ मध्ये, मलेशियामध्ये मिथेनॉल विषबाधेमुळे अनेकांचे अवयव कायमचे निकामी झाले, तर ६४ जणांचा मृत्यू झाला. डिसेंबर २०२१ ते मे २०२२ दरम्यान झालेल्या व्यापक मोहिमेचा भाग म्हणून, २६ देशांच्या अधिकाऱ्यांनी जवळपास २७,००० टन बनावट अन्न आणि १.५ कोटी लिटर मद्यपेये जप्त केली होती. ऑक्टोबर २०२२ मध्ये, पाकिस्तानच्या अन्न सुरक्षा आणि हलाल अन्न प्राधिकरणाने साखर, रसायने आणि मेण यांची भेसळ असलेला ४००० लिटर बनावट मध जप्त केला. डिसेंबर २०२२ मध्ये, भारतातील बिहारमध्ये भेसळयुक्त दारू प्यायल्याने १२ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि १५ हून अधिक लोकांची दृष्टी गेली. जुलै २०२२ मध्ये, भारतातील अधिकाऱ्यांनी ३० टन भेसळयुक्त पदार्थ मिसळलेले जिरे जप्त केले.

आधुनिक काळात अन्न भेसळ संशोधनात लक्षणीय तांत्रिक प्रगती होत आहे. पूर्वी, भेसळयुक्त अन्न उत्पादने काही भौतिक मापदंडांच्या आधारावर ओळखली जात होती. आता जागतिक बाजारपेठांच्या विस्तारामुळे आणि व्यावसायिक स्पर्धेमुळे, अन्न भेसळीचे प्रमाण वेगाने वाढले आहे. निकृष्ट दर्जाचे घटक वापरून कच्च्या मालाचा आणि उत्पादनाचा खर्च कमी करणे, हा अन्न भेसळीमागील मुख्य उद्देश असतो हे स्पष्ट आहे. खाद्यपदार्थांचे भौतिक गुणधर्म आणि चव अनेक प्रकारे बदलली जातात. फळे कृत्रिमरीत्या पिकवणे हा अन्न भेसळीचा एक सामान्य प्रकार आहे. संरक्षक, रंग आणि कृत्रिम गोडवा वापरून केलेली भेसळ ही देखील अन्न भेसळीची सामान्य तंत्रे आहेत. उत्पादनाविषयी खोटी माहिती देणे यालाही भेसळ मानले जाते. कोणत्याही खाद्यपदार्थांची निवड करताना ग्राहक सर्वसाधारणपणे त्यांचा रंग, पोत आणि स्वरूप हे महत्त्वाचे निकष मानतो. आकर्षक रंग असलेल्या खाद्यपदार्थांमुळे त्यांची बाजारपेठेतील मागणी आणि नफा वाढतो. फळे आणि भाज्या ग्राहकाच्या माथी मारण्याच्या धंद्यात, नैसर्गिक रंगाहून अधिक आकर्षक असलेल्या कृत्रिम रंगांचा वापर होतो. ग्राहकांची पसंती वाढवण्यासाठी टरबुजांमध्ये लाल रंग टाकला जातो. हिरवी मिरची, हिरवे वाटाणे, कारले, भेंडी यांसारख्या हिरव्या भाज्यांना अधिक हिरव्या, ताज्या, चमकदार आणि तेजस्वी दिसण्यासाठी मॅलाकाईट ग्रीनचा वापर केला जातो, तर वांगी, टोमॅटो, फुलकोबी आणि पानकोबीमध्ये रंगासाठी मोबाईल ऑईल आणि ताजा जांभळा रंग येण्यासाठी कार्बोफ्युरानची इंजेक्शने दिली जातात. अंडी कृत्रिमरीत्या रंगवली जातात, तर अंड्याच्या पिवळ्या बलकाचा रंग अधिक आकर्षक करण्यासाठी कोंबड्यांनाच रंग मिसळलेले खाद्य दिले जाते, असे अनेक प्रकार काही आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणांतून उघडकीस आले आहेत.

मानवी जीवनाशी खेळ खेळणारा हा धंदा सर्वांच्याच दृष्टीने चिंताजनक ठरला आहे. महाराष्ट्रात आणि देशातही, अन्नपदार्थ व खाद्यपदार्थांतील भेसळीचे प्रकार रोखण्यासाठी कठोर कायद्यांची तरतूद आहे. गेल्या आठवड्यात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानेही भेसळीच्या आव्हानाची गंभीर दखल घेतली. या धोक्यास सामोरे जाण्यासाठी करावयाच्या उपायांचा विचार करण्यासाठी गेल्या ७ एप्रिल रोजी नवी दिल्लीत आयोगाने आयोजित केलेल्या एका उच्चस्तरीय बैठकीत अन्न भेसळीचा गंभीर धोका अधोरेखित करण्यात आला. केवळ कायदे किंवा कारवाया करून ही दुष्प्रवृत्ती नष्ट होणार नाही, तर जनजागृती आणि खाद्यसुरक्षेविषयीची सावधानता यातूनच भेसळखोरीला आळा घालण्यास मदत होईल, असे मत आयोगाचे सदस्य न्या. डॉ. बिद्युतरंजन सारंगी यांनी व्यक्त केले, तर भेसळीचे प्रकार थांबविण्यासाठी बहुस्तरीय कार्यगट स्थापन करावा अशी सूचना आयोगाच्या सदस्य विजया भारती यांनी केली. भेसळीचे गंभीर परिणाम विशेषत: गर्भवती महिला बालके आणि वयोवृद्धांच्या आरोग्यावर होत असल्याची बाब आयोगाचे महासचिव भरत लाल यांनी अधोरेखित केली आणि भेसळयुक्त अन्नपदार्थांची ओळख पटविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तायुक्त उपकरण विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला. जिथे मानवी बुद्धी कुंठित होते, तेथे कृत्रिम बुद्धिमत्ता कामास येते, हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. भेसळयुक्त जगण्यापासून जगाची मुक्तता करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झाला, तर ते एक मोठे वरदान ठरेल.


dineshgune@gmail.com

---

## रविवारची पत्रे

### ''संगीत सरिता''मध्ये घुमला नागपूरकर तिजारेंचा तबला

''विदर्भ विषयः सारस्वतीजन्मभू'' असा गौरवपूर्ण उल्लेख वत्सगुल्म (वाशीम) येथील वाकाटकांचे राजकवी राजशेखर यांनी करून ठेवला आहे. तो सार्थ ठरविणारी अनेक उदाहरणं आपल्याकडे आहेत. विदर्भ हा प्राचीन काळापासूनच साहित्य, संगीत आदी कलांमध्ये अग्रेसर असलेला प्रदेश राहिलेला आहे आणि ती परंपरा आजही कायम आहे. संगीत क्षेत्रात विदर्भाचा सन्मान देशभरात वाढविणारा असाच एक कलावंत म्हणजे नागपूरचे तबलापटू अच्युत शोभा मुकुंद तिजारे. या पठ्ठ्यानं लागोपाठ दोन वर्षी विदर्भाच्या शिरपेचात दोन मानाचे तुरे खोवण्याचा पराक्रम केला आहे.



आकाशवाणीची राष्ट्रीय वाहिनी ''विविध भारती''वर नुकतीच (१ ते १० मार्च २०२६) त्यांनी लोकप्रिय ''संगीत सरिता'' कार्यक्रमात ''तबला और उसकी विरासत'' ही मालिका सादर करून देशभर वाहवा मिळविली. संगीत सरितामध्ये आमंत्रित कलाकार म्हणून नागपूर-विदर्भातील कलावंताला अशी संधी प्रथमच मिळाली आहे. त्याबद्दल अच्युत तिजारे यांचं करावं तेवढं अभिनंदन थोडं आहे.

त्याच्या आधी, गतवर्षीच्या अखेरीस तर त्यांनी एक राष्ट्रीय पुरस्कारच पटकावला. ज्येष्ठ संगीतज्ञांना प्रोत्साहन देण्यासाठी स्थापन झालेल्या ''खयाल ५० अबाऊट ५०'' या संस्थेनं तिजारेंना हा सन्मान मिळवून दिला. नॅशनल टॅलेंट हंट या देशव्यापी स्पर्धेतील वादन गटात ''इन्स्ट्रुमेंटल मेस्ट्रो ऑफ द इयर २०२५'' हा अत्यंत सन्मानाचा पहिला पुरस्कार तिजारेंना मिळाला. या स्पर्धेत प्रेक्षक-श्रोत्यांच्या गुणांकनालाही विशेष महत्त्व होते. त्यात तिजारेंनी देशभरात बाजी मारून पुरस्कार जिंकला, हे विशेष. त्यांचं तबलावादन किती भावणारं असेल, याची यावरून कल्पना येते. ते आकाशवाणीचे अ श्रेणी कलावंत असून, अनेक नामवंत गायक-वादकांना त्यांनी समर्थ साथही केली आहे.

नागपूरचे प्रसिद्ध गुलाबप्रेमी मुकुंद तिजारे यांचे सुपुत्र असलेले अच्युत सध्या मुंबईत बँक अधिकारी आहेत. बालपणापासूनच तबल्याची आवड असल्यानं रीतसर प्रशिक्षण घेऊन गेली ३० वर्षे या क्षेत्रातील एकेक शिखर ते पादाक्रांत करीत आहेत. सुदैवानं त्यांना चांगले गुरूही लाभले. पं. सुभाष राजहंस, पं. केशवराव राजहंस, पं. उल्हास राजहंस, पं. अभिजित मजूमदार, उस्ताद अहमदजान थिरकवांचे शिष्य पं. भाई गायतोंडे, पं. विभव नागेशकर अशी त्यांची गुरुपरंपरा आहे. परिणामी दिल्ली, अजराडा, लखनौ आणि फरूखाबाद या चारही तबला घराण्यांची तालीम त्यांना मिळाली आणि त्यांच्या तबलावादनाला एक परिपूर्णता आली. त्यामुळेच खयाल ५० असो की संगीत सरिता असो, त्यांनी रसिकांची मनं सहज जिंकून घेतली.

साहजिकच नागपूर-विदर्भाला या गुणवान तबलापटूचा सार्थ अभिमान वाटतो. भविष्यातही त्यांच्या तबल्याची जादू अधिकाधिक रसिकांना आनंद देत राहो, अशा शुभेच्छा आपण त्यांना देऊया.

**विनोद देशमुख**/९८५०५८७६२२

### झटपट कर्ज... नको रे बाप्पा

मोबाईलने डिजिटल क्रांती केली खरी पण तेवढीच डोकेदुखी पण वाढवली. खिशात मावणाऱ्या या मोबाईलमध्ये आम्ही ढिगभर डाटा ठेवायला लागलो. कोणत्याही कार्यक्रमाचे क्षण त्यात फोटो बनून राहू लागले. हे करता करता आम्ही आमच्या गरजेची महत्त्वाची कागदपत्रे जसे आधार कार्ड, बँक पासबुक, पॅन कार्ड पण मोबाईलमध्ये फोटो स्वरूपात ठेवायला लागलो. काही लोक डिजी लॉकमध्ये ठेवतात ते बरे पण असे कितीसे लोक असतील? आणि रोज एक दोन मेसेज यायला लागले ''अभिनंदन एक लाख रुपयाचे पर्सनल लोन खास तुमच्यासाठी तयार आहे, बस क्लिक करा अथवा संपर्क करा'' असे मेसेज यायला लागले. आणि ज्यांना खरचं गरज आहे ते अशा मेसेजमध्ये फसायला पण लागले. मग तुमची कागदपत्रे अनेक कंपन्यांकडे आपोआप जातात आणि ते तुमच्या नावाचा वापर करून कर्ज घेतल्याचे दर्शवतात. सतत तुम्हाला त्यासाठी फोन करतात. तुम्ही कर्ज घेतलेले नसते तरी तुमच्यावर मानसिक दबाव आणतात. पण या सर्व बोगस बँका, कंपन्या असतात हे लक्षात ठेवा. मोबाईल चोरून तुमचा डाटा क्षणात अशा फसवेगिरी करणाऱ्या लोकांपर्यंत पोहचतो आणि ते तुमच्या नावाचा वापर तर करतात सोबतच तुमची खुफीया माहिती पण काढतात. तुम्ही कुठे जाता, कुठे राहता, शेजारी कोण कोण राहतात हे सर्व त्यांना माहीत असतं. हे रॅकेट फार दूरवर पसरलं असतं. महाराष्ट्रात आज हजारो लोक या समस्येने घेरले आहेत. खरे म्हणजे अशा बोगस बँका, कंपन्या ताबडतोब बंद व्हायला हव्या. ज्या लोकांच्या आधार कार्ड, पॅन कार्डचा वापर चोरट्यांनी केला आहे त्यांचा तो नंबर गाळून त्यांना नवीन आधार नंबर व पॅन कार्ड द्यायला हवा. अशानेच जुन्या कागदपत्रांच्या आधारावर वरचेवर चोरटे कर्ज केस बनवू शकणार नाहीत. डिजिटल क्रांतीचा ज्यांना त्रास झाला आहे ते जुनीच व्यवस्था अवलंबीत आहे आणि हे दिवसेंदिवस वाढणार आहे. संबंधितांच्या कागदपत्रांची शहनिशा न करता या बँका, सोसायट्या सर्रास कर्जवाटप करत आहेत. सरकारने याकडे लक्ष देण्याची गरज आहे आणि जनतेने सुद्धा जागरूक राहण्याची गरज आहे. झटपट कर्जाच्या नादापेक्षा जे आहे त्यातच समाधान मानावे असे दिवस आले आहे.



**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### बालपण देगा देवा...

''बालपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा'' हे आपल्या संतांनी देवाकडे बालपणाचे मागणे मागितले होते. म्हणजे संतांनाही बालपणाचा मोह सुटला नव्हता तर आपण तर एक सर्वसामान्य माणूस आहोत आपल्यालाही बालपणाचा मोह कसा होणार नाही? मानवी जीवनाच्या प्रवासात अनेक टप्पे येतात, पण त्यातला सर्वांत सुंदर, निरागस आणि अविस्मरणीय टप्पा म्हणजे बालपण.

बालपणाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील त्या वयात मनावर कोणत्याही संस्कारांचे, समाजाच्या बंधनांचे किंवा भेदाभेदांचे ओझे नसते. मूल कोणाशीही तितक्याच आपुलकीने बोलते आणि खेळते. त्या डोळ्यांत ना कोणाबद्दल द्वेष असतो, ना मत्सर. कट्टी झाल्यावर पुन्हा बट्टी करण्यासाठी लागणारा तो पाच मिनिटांचा वेळ म्हणजे जगातील सर्वांत मोठे मित्रत्वाचे उदाहरण आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात माणसाला पावलोपावली ताण जाणवतो. पण बालपणीच्या जगात टेन्शन नावाचा शब्दच अस्तित्वात नसतो. उद्या काय होईल? करीअरचं काय? आर्थिक ओढाताण कशी सोसायची? या प्रश्नांऐवजी आज कोणता खेळ खेळायचा, पावसात कागदाची होडी कधी सोडायची हेच सर्वांत मोठे प्रश्न असायचे. मोठेपणी आपण सुखासाठी महागड्या वस्तू आणि सुविधेवर अवलंबून असतो. मात्र बालपणी सुख अगदी स्वस्त आणि सहज उपलब्ध असते. शाळेला मिळालेली सुट्टी. आजीने सांगितलेली परीची गोष्ट. कडक उन्हात खाल्लेला बर्फाचा गोळा. पावसात भिजून मातीत केलेले किल्ले. या छोट्या छोट्या गोष्टींमधून जो परमानंद मिळतो, तो आज करोडो रुपये खर्च करूनही विकत घेता येत नाही. बालपणी आपण निसर्गाच्या खूप जवळ असतो. झाडावर चढणं, फुलपाखरांच्या मागे धावणं, पावसात नाचणं हे सगळं जगणं समृद्ध करत असतं. त्याचबरोबर आजी-आजोबांच्या मांडीवर डोकं ठेवून ऐकलेल्या गोष्टी आयुष्याला लागणारी जीवन भराची शिदोरी देऊन जातात. त्याकाळी मोबाईल नव्हता, पण माणसांची सोबत आणि निखळ प्रेम भरपूर होतं. जसे जसे वय वाढते, तशी जबाबदारीची जाणीव होते आणि माणसातील निरागसपणा कमी होऊ लागतो. आपण व्यवहारी होतो, स्वार्थी होतो आणि स्पर्धेत धावू लागतो. पण जर आपल्याला खऱ्या अर्थाने सुखी व्हायचे असेल, तर आपल्यातील बालपण नेहमी जिवंत ठेवणे गरजेचे आहे. कधीतरी पावसात भिजणे, कधी लहान मुलांसोबत मूल होऊन खेळणे किंवा कधीतरी कामाचा ताण बाजूला सारून स्वतःसाठी वेळ देणे, हेच आपल्याला पुन्हा त्या आनंदाची अनुभूती देऊ शकते.

बालपण हे केवळ वयाचा एक टप्पा नाही, तर तो एक दृष्टिकोन आहे. बालपण परत येत नाही हे जरी सत्य असले, तरी त्या आठवणींच्या पाऊलखुणा जपून ठेवणं आपल्या हातात आहे. म्हणूनच म्हणावसं वाटतं की, ईश्वराने माणसाला दिलेली सर्वांत मौल्यवान भेट म्हणजे त्याचे बालपण होय.

**मोहन कळमकर**/७३८५८६१४४६

### आवडती राणी आणि पिठाचे मणी

मराठीत एक म्हण आहे ''आवडती व्यक्ती असेल तर तिच्या सर्व गोष्टी मान्य असतात, पण नावडती असेल तर तिची चांगली गोष्टही खुपते.'' ही म्हण सध्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पक्ष प्रमुख शरद पवार यांच्या भूमिकेला तंतोतंत लागू पडताना दिसत आहे.

लवकरच होणाऱ्या बारामती पोटनिवडणुकीसंदर्भात पार्थ पवार यांनी काँग्रेस पक्षासंबंधी एक विधान केले होते. या विधानावर शरद पवारांनी ज्या पद्धतीने आपला जाहीर संताप व्यक्त केला, त्यातून त्यांची पार्थ पवारांबद्दलची टोकाची नाराजी पुन्हा एकदा समोर आली. यापूर्वीही पार्थ पवारांच्या विधानांवरून ''त्याला अजून समज नाही'' किंवा ''त्याच्या विधानाला आम्ही कवडीचीही किंमत देत नाही'' असे म्हणून शरद पवारांनी त्यांना जाहीरपणे फटकारले होते. मात्र, दुसरीकडे त्यांचे दुसरे नातू आमदार रोहित पवार हे सातत्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत संशयाचे काहूर माजवत आहेत. स्वतः शरद पवारांनी पहिल्याच दिवशी सर्व विरोधी नेत्यांना या अपघाताबाबत कोणतीही शंका उपस्थित न करण्याचा सल्ला दिला होता. असे असतानाही रोहित पवार सातत्याने महायुतीतील नेत्यांवर आणि मित्रपक्षाच्या मंत्र्यांवर संशयास्पद विधाने करत आहेत. विशेष म्हणजे, स्वतःचा शब्द डावलला जात असूनही शरद पवार रोहित पवारांना साधा सबुरीचा सल्लाही देत नाहीत किंवा पूर्ण चौकशी होईपर्यंत शंका उपस्थित करू नको असे बजावत नाहीत. पार्थ पवारांना समज नाही म्हणणारे पवार, रोहित पवारांच्या संशयास्पद विधानांवर मात्र मौन बाळगून आहेत. राजकारणातील या उघड दुजाभावाकडे पाहिल्यावर ''आवडती राणी आणि पिठाचे मणी'' ही म्हण या परिस्थितीला अगदी चपखल बसते.

**अविनाश देशपांडे**/पुणे

---

## भारतातील 'तरुण' लोकसंख्येचे 'रुपेरी' आव्हान...

भारत आज जगातील सर्वांत मोठ्या तरुण लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जातो. हीच तरुण लोकसंख्या देशाची सर्वांत मोठी ताकद मानली जाते. मात्र, या ताकदीसोबत एक दीर्घकालीन वास्तव जोडलेले आहे- आजचा हा तरुण वर्ग पुढील दोन दशकांत मोठ्या प्रमाणावर ज्येष्ठ नागरिकांमध्ये रूपांतरित होणार आहे. त्यामुळे भारताच्या आरोग्य व्यवस्थेसमोर उभे राहणारे आव्हान हे केवळ व्यवस्थापनाचे नसून, ते सामाजिक, आर्थिक आणि धोरणात्मक स्वरूपाचे आहे.

एकूण पाहता, आजमितीस भारतात १६ कोटी ज्येष्ठ नागरिक आहेत आणि हीच संख्या २०३५ पर्यंत २४ कोटींवर पोहोचणार आहेत. ही वाढ केवळ लोकसंख्येतील बदल नसून, आरोग्य व्यवस्थेच्या क्षमतेची खरी परीक्षा आहे. जर सध्याच्या पायाभूत सुविधा, डॉक्टरांची उपलब्धता, विमा व्यवस्था आणि जनजागृती यामध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाली नाही, तर २०३५ पर्यंत भारताला 'हेल्थकेअर स्ट्रेस'चा गंभीर सामना करावा लागू शकतो.

पण याच परिस्थितीत एक संधीही दडलेली आहे. योग्य नियोजन केल्यास भारत 'सिल्व्हर इकॉनॉमी'मध्ये जागतिक नेतृत्व करू शकतो. २०३५ पर्यंत हे भारतासाठी केवळ लोकसंख्येतील बदलाचे वर्ष नसून, आरोग्य व्यवस्थेच्या भवितव्याचा निर्णायक टप्पा ठरणार आहे. याचा अर्थ असा की, आजच्या तुलनेत अनेक पटींनी अधिक लोकांना दीर्घकालीन डॉक्टर्स, रुग्णालये, आरोग्यसेवा, औषधे आणि विमा इ. संसाधनांची गरज भासणार आहे. आधीच डॉक्टरांची कमतरता, हॉस्पिटल बेड्सची अपुरी संख्या आणि ग्रामीण-शहरी दरी या समस्या अस्तित्वात असताना, या वाढत्या मागणीचा सामना करणे ही मोठी कसोटी ठरणार आहे. तथापि, भारताचे चित्र केवळ आव्हानांचे नाही. उलटपक्षी, या बदलत्या लोकसंख्येच्या पृष्ठभूमीवर भारताकडे काही अद्वितीय ताकदीही आहेत. भारत हा जगातील सर्वांत मोठे जेनेरिक औषध उत्पादक देशांपैकी एक आहे, ज्यामुळे औषधांची किंमत तुलनेने कमी राहते. तसेच, इतर विकसित देशांच्या तुलनेत भारतात सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा स्वस्त आहेत. यामुळे 'मेडिकल टुरिझम'साठी भारत एक महत्त्वाचे केंद्र बनत आहे. कुशल डॉक्टर, वाढते खाजगी रुग्णालयांचे जाळे आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर या सर्व गोष्टी भारताला जागतिक आरोग्य क्षेत्रात महत्त्वाची भूमिका देऊ शकतात.

मात्र, या ताकदीचा योग्य उपयोग करण्यासाठी नियोजनबद्ध पावले उचलणे अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम, सरकारने आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढवणे गरजेचे आहे. सध्या भारताचा सार्वजनिक आरोग्य खर्च जीडीपीच्या सुमारे २ टक्क्यांच्या आसपास आहे, जो विकसित देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. ही गुंतवणूक वाढवून प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये आणि ग्रामीण आरोग्यसेवा अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, डॉक्टर, नर्सेस आणि इतर सहायक वैयक्तिक सेवा तयार करण्यासाठी वैद्यकीय शिक्षणाचा विस्तार आणि गुणवत्ता सुधारणा हीदेखील महत्त्वाची बाब आहे. आरोग्य विम्याच्या क्षेत्रात, सर्व ज्येष्ठ नागरिकांना विमा कवच देण्याची गरज आहे. आजही मोठा वर्ग विम्याच्या कक्षेबाहेर आहे आणि वृद्धावस्थेत विमा मिळवणे अधिक कठीण होते आहे. त्यामुळे तरुण वयातच विमा सुलभ आणि परवडणारा बनवणे, तसेच सार्वजनिक आणि खाजगी विमा योजनांमध्ये समन्वय साधणे आवश्यक आहे.

परंतु या सर्व उपाययोजनांसोबत एक अत्यंत महत्त्वाचा घटक दुर्लक्षित करता येत नाही, तो म्हणजे जनजागृती. भारतात अजूनही आरोग्य विमा, प्रिव्हेंटिव्ह हेल्थकेअर आणि नियमित तपासणी याबाबत पुरेशी जागरूकता नाही. विशेषतः असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांमध्ये आरोग्य सुरक्षेबाबतची जाणीव कमी आहे. या पृष्ठभूमीवर सरकार, स्वयंसेवी संस्था आणि खाजगी क्षेत्र यांनी एकत्रितपणे व्यापक जनजागृती मोहीम राबवणे आवश्यक आहे. जसे बँकिंग क्षेत्रात 'जनधन योजना'मुळे आर्थिक समावेशन वाढले, तसेच आरोग्य क्षेत्रातही 'हेल्थ इन्क्लुशन' घडवून आणणे गरजेचे आहे.

असंघटित क्षेत्रातील कामगार- जसे की शेतमजूर, बांधकाम कामगार, छोटे व्यावसायिक हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा मोठा भाग आहेत. त्यांच्यासाठी कमी प्रीमियमच्या 'मायक्रो-इन्शुरन्स' योजना, सहकारी संस्थांद्वारे सामूहिक विमा आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या मदतीने सहज नोंदणी या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात. उदाहरणार्थ, दररोज अगदी अल्प रक्कम (जसे १०-- २० रुपये) बचत करून मोठ्या प्रमाणावर आरोग्य विमा कव्हरेज निर्माण करता येऊ शकते, जर योग्य रचना आणि विश्वासार्ह अंमलबजावणी असेल तरच. याला हेल्थ क्रेडिट स्किम असे म्हणतात. या संदर्भात नारायण हृदयालयाचे संस्थापक यांचे कार्य आणि त्यांचा दृष्टिकोन अत्यंत प्रेरणादायी ठरतात. या रुग्णालय साखळीने ''कमी खर्चात उत्तम दर्जाची आरोग्य सेवा'' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांनी ५ ते १० लाख रुपयाचा आरोग्य विमा अत्यंत कमी पैशात उपलब्ध करून दिलेला आहे जेणे करून कुटुंबाची आरोग्य जोखीम घेण्याची क्षमता वाढेल. तसेच त्यांच्या रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया ७५ हजार रुपयांत होतात. भारतात आरोग्य सेवा महाग असण्याचे कारण तंत्रज्ञान नाही, तर व्यवस्थापन आणि स्केलचा अभाव आहे. 'इकॉनॉमीज ऑफ स्केल' चा वापर करून हृदय शस्त्रक्रिया अत्यंत परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून दिल्या जाऊ शकतात. आणखी एक महत्त्वाची कल्पना म्हणजे 'मास हेल्थ इन्शुरन्स.' जर मोठ्या लोकसंख्येने अल्प प्रीमियम भरून विमा घेतला, तर संपूर्ण देशासाठी अत्याधुनिक आरोग्यसेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध होऊ शकतात.

मोठ्या हॉस्पिटल चेनसमोरही काही स्पष्ट जबाबदाऱ्या उभ्या राहतात. केवळ महानगरांमध्ये अत्याधुनिक सुविधा उभारण्यापेक्षा, टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये विस्तार करणे ही काळाची गरज आहे. 'व्हॅल्यू-बेसड हेल्थकेअर' या संकल्पनेनुसार, कमी खर्चात दर्जेदार सेवा देणे हे ध्येय असले पाहिजे. याशिवाय, वृद्धांसाठी विशेष 'जेरिएट्रिक्स केअर', घरपोच आरोग्यसेवा आणि दीर्घकालीन उपचारांसाठी स्वतंत्र सुविधा उभारणे आवश्यक ठरणार आहे. या सर्व आव्हानांमध्येच भारतासाठी एक मोठी आर्थिक संधीही दडलेली आहे. वाढती ज्येष्ठांची संख्या, वाढणारी आरोग्य जाणीव आणि विम्याचा विस्तार यामुळे आरोग्य क्षेत्र हे पुढील दशकात सर्वांत वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी एक ठरणार आहे. हॉस्पिटल्स, डायग्नोस्टिक सेंटर्स, औषधनिर्मिती, वैद्यकीय उपकरणे, होम हेल्थकेअर आणि वृद्ध सेवा या सर्व क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण होणार आहेत.

आजच्या तरुणांसाठी ही एक सुवर्णसंधी आहे. वैद्यकीय शिक्षण, नर्सिंग, फार्मसी, हेल्थ टेक, बायोटेक्नॉलॉजी आणि हेल्थ मॅनेजमेंट या क्षेत्रांमध्ये करीअरच्या असंख्य वाटा खुल्या होत आहेत. तसेच, स्टार्टअप्सच्या माध्यमातून डिजिटल हेल्थ, रिमोट डायग्नोस्टिक आणि एलडरली केअर यासारख्या नव्या क्षेत्रांमध्ये नावीन्यपूर्ण उपाय विकसित करण्याची मोठी संधी आहे. लवकरच रुग्णांना आयसीयूमध्ये न ठेवता, घरच्या घरी, रिमोट कंट्रोल मेडिकल सर्व्हिलन्स मॉनिटरिंग ही सुविधा, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपचार देण्यास सक्षम होणार आहे. भारताच्या किफायतशीर आरोग्य सेवांचा जागतिक स्तरावर विस्तार करण्यासाठी तरुण उद्योजक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. शेवटी, भारताचे वैद्यकीय भविष्य अशा वळणावर उभे आहे की ही आव्हाने संधी म्हणून स्वीकारली तर भारत जागतिक आरोग्य क्षेत्रात अग्रणी स्थान मिळवू शकतो. आजच योग्य निर्णय घेतले तर उद्याचा भारतीय ज्येष्ठ नागरिक सुरक्षिततेत, सन्मानाने आणि निरोगी आयुष्य जगेल. या निर्णयांमध्ये सरकार, उद्योगक्षेत्र आणि समाज जितके महत्त्वाचे आहेत, तितकाच महत्त्वाचा आहे जागरूक, जबाबदार आणि दूरदृष्टी असलेला आजचा तरुण वर्ग.

**इंजि. दीपक दोडके**/समाज बदलाचे अभ्यासक

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# डॉ.होमीभाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत चि. वरद देशमुख ला मिळाले सिल्वर मेडल



तभा. वृत्तसेवा

**बीड** | विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील प्रतिष्ठेची आणि अवघड असलेली डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत श्री योगेश्वरी नूतन विद्यालय अंबाजोगाई चा विद्यार्थी चि. वरद सुवर्णा विवेक देशमुख याने इयत्ता नववी इंग्लिश माध्यमातून सिल्वर मेडल मिळवले. हा भव्य दिव्य असा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम मुंबई येथे यशवंतराव चव्हाण नाट्य मंदिर मुलुंड येथे डीआरडीओ चे वैज्ञानिक अशोक नगरकर, मधुबाला चिंचाळकर आणि प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत पार पडला. विशेष बाब म्हणजे चि. वरदने इयत्ता सहावी मध्ये सुद्धा या परीक्षेत सिल्वर मेडल मिळवले होते त्याच्या या यशाबद्दल त्याचे सर्वांकडून कौतुक व अभिनंदन होत आहे.

# प्रदीप माने यांची शिवसेना बीड विधानसभा संघटकपदी नियुक्ती!



तभा. वृत्तसेवा

**बीड, प्रतिनिधी** | वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या आशीर्वादाने शिवसेना मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड विधानसभा क्षेत्रासाठी प्रदीप माने यांची संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, मराठवाडा संपर्कप्रमुख तथा राज्याचे आरोग्यमंत्री ना. प्रकाशजी आबिटकरसाहेब, विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब आणि बीड लोकसभा संपर्कप्रमुख मनोजजी शिंदे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या आदेशानुसार करण्यात आली.

दि. ९ एप्रिल २०२६ रोजी प्रकाश आबिटकर यांच्या शुभहस्ते प्रदीप माने यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत, बीडमध्ये शिवसेना संघटना अधिक मजबूत करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली.

# बीड येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी

तभा. वृत्तसेवा

**बीड** | दीनदयाल शोध संस्थान संचालित जन शिक्षण संस्थान, बीड येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली*.

या प्रसंगी जन शिक्षण संस्थान बीड चे संचालक श्री. गंगाधरजी देशमुख यांनी महात्मा फुले यांच्या क्रांतीकारी जीवनावर आणि त्यांच्या सामाजिक-शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, महात्मा ज्योतिबा फुले हे आधुनिक भारताचे शिल्पकार, थोर समाजसुधारक आणि सामाजिक कार्याचे अग्रदूत होते. त्यांनी विषमतेच्या अंधकारातून समाजाला बाहेर काढण्यासाठी आपले आयुष्य वेचले. महात्मा फुले यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे शिक्षणाची द्वारे सर्वांसाठी खुली केली.

# जिल्ह्यात 2 हजार 360 गोरगरीब विद्यार्थ्यांना मिळणार इंग्रजी शाळेत मोफत प्रवेश

## शिक्षण विभागाने बोगस प्रवेश घेणाऱ्या पालकांविरोधात पोलिसांत गुन्हे दाखल करावेत : मनोज जाधव

### 'आरटीई' प्रवेशासाठी निवड यादी जाहीर

तभा. वृत्तसेवा



**बीड (प्रतिनिधी)** | शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेसाठी काढण्यात आलेल्या सोडतीतून जिल्ह्यात एकूण २ हजार ३६० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना ११ ते २० एप्रिल या कालावधीत प्रवेश निश्चित करता येणार असल्याची माहिती शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी दिली.

ठळक मुद्दे : १) सोडतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर प्रवेशाबाबत एसएमएस पाठविण्यात येणार आहेत. मात्र, पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता स्वतः माहिती पडताळून घ्यावी. २) निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा प्रशासन अधिकाऱ्यांकडे जाऊन कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी. पडताळणी समितीकडून कागदपत्रे प्रमाणित झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशासाठी ऑनलाइन परवानगी देण्यात येईल.

चौकट : या प्रवेश प्रक्रियेत गोरगरीब, वंचित आणि खऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांच्या हक्कांवर गदा येत असून काही अपात्र पालक खोट्या कागदपत्रांच्या आधारे प्रवेश मिळवत असल्याचे निदर्शनास येत आहे. यात भाडेकरार, आधारकार्ड व इतर कागदपत्रांचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत आहे. शिक्षण हक्क कायदा अत्यंत कडक असून त्यानुसार कारवाई होणे आवश्यक आहे. नागपूर जिल्ह्यात ज्या प्रकारे खोट्या कागदपत्रांद्वारे प्रवेश घेणाऱ्या पालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले, त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातही अशा प्रकारच्या पालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

आरटीई अंतर्गत जिल्ह्यातील २१४ शाळांमध्ये २ हजार ४२५ जागा उपलब्ध आहेत. या जागांसाठी ६ हजार ३१६ अर्ज दाखल झाले होते. जागांच्या तुलनेत अर्जांची संख्या जास्त असल्याने ६ एप्रिल रोजी सोडत काढण्यात आली. त्यातून २ हजार ३६० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून १ हजार ९१२ विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात आली आहे.

प्रवेशासाठी निवडयादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात आली असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना २० एप्रिलपर्यंत प्रवेश घेण्याची मुदत देण्यात आली आहे. नियमित प्रवेश पूर्ण झाल्यानंतर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी दिली जाणार आहे. यासाठी विविध प्रवेश फेऱ्या राबवून जूनपर्यंत संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे.

# साबला येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी



तभा. वृत्तसेवा

**केज** | प्रतिनिधी | येथील ग्रामपंचायत कार्यालय आणि समस्त गावकऱ्यांच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि चैतन्यपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'भव्य सत्कार समारंभात' विविध क्षेत्रातील मान्यवरांचा विशेष गौरव करण्यात आला. हा सोहळा शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ०९:०० वाजता साबला येथील श्रीराम भक्त हनुमान मंदिर परिसरात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी महात्मा फुलेंच्या सामाजिक कार्याचा आणि विचारांचा जागर केला.

या विशेष गौरव सोहळ्यात समाजातील विविध स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या खालील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. डॉ. दिनकर रावसाहेब राऊत, प्रा. विष्णू रानबा सरवदे, कु.ऋतुजा अशोक नाईकनवरे, चि. अविनाश गुलाब काकडे, श्रीमती वैशाली विजय सरवदे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.शांतिनाथ बनसोडे सर परीक्षा नियंत्रक नांदेड विद्यापीठ व माजी सभापती मा. विष्णुभाऊ घुले उपस्थित होते.

# किल्लेधारुरमध्ये समतेचा जागर करत गुणवंतांचा शाही सन्मान

## महात्मा फुलेंच्या विचारांची आजच्या काळात अंमलबजावणी होणे हीच खरी आदरांजली; मान्यवरांचे प्रतिपादन



तभा. वृत्तसेवा

**किल्ले धारूर** | (प्रतिनिधी) क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त किल्ले धारूर येथे समता, शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा भव्य कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. सकल माळी समाजाच्या वतीने आयोजित या सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. हुतात्मा स्मारक परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी महात्मा फुले यांच्या महान कार्याचा गौरव केला. "महात्मा फुलेंनी विषमतेच्या अंधकारात शिक्षणाची ज्योत पेटवली. आजच्या काळातही समाजाने शिक्षण, समता आणि बंधुत्वाच्या विचारांचा स्वीकार करून प्रगतीचा मार्ग अवलंबावा," असे आवाहन त्यांनी केले. केवळ जयंती साजरी न करता, त्यांच्या विचारांची प्रत्यक्ष जीवनात अंमलबजावणी करणे हीच काळाची गरज असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

गुणवंतांचा गौरव आणि मान्यवरांची उपस्थिती

याप्रसांगी प्रमुख पाहुणे म्हणून उपनगराध्यक्ष सय्यद शाकेर, ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन, सूर्यकांत जगताप, नगरसेवक विनायक शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता अधोरेखित केली. या सोहळ्यात प्रा. मेजर शांतीराम बनसोडे, ऋतुजा अशोक नाईकनवरे, वैष्णवी उद्धव खाडे, स्नेहल श्रीकांत कोकाटे, आदित्य नवनाथ फुटाणे, विजय संजय फुटाणे, अनंत राजेश फुटाणे, डॉ. आकेश भारत सत्वधर आदी गुणवंतांचा शाही सत्कार करण्यात आला.

यांची लाभली उपस्थिती कार्यक्रमास गटनेते नितीन शिनगारे, नगरसेवक सचिन जाधव, गणेश सावंत, बालाजी चव्हाण, प्रवीण गायके, आनंद भावठाणकर, नगरसेविका मनिषा सोनवणे, संदीप शिनगारे, बालाजी निर्मळ, बाळासाहेब खामकर, बाळासाहेब शिरसाट, पत्रकार सचिन थोरात, ईश्वर खामकर, सुनील कावळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंकुश फुटाणे यांनी केले, तर सूत्रसंचालन दिनेश कापसे यांनी प्रभावीपणे केले. शेवटी दत्तात्रय गोंदणे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सकल माळी समाजाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्यात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

# पुस्तकांमुळे मी घडलो | ॲड. प्रा.गोविंदराव पांडे

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | आंतरभारती शाखा, अंबाजोगाई यांच्या वतीने दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता "मेरी बात" या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मानवलोकच्या जनसहयोग कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमात ॲड. प्रा. गोविंदराव पांडे यांनी आपले जीवनानुभव मांडत "पुस्तकांमुळे मी घडलो" हा संदेश प्रभावीपणे मांडला. जन्मापासून ते आयुष्याच्या जडणघडणी पर्यंतचा प्रवास त्यांनी अत्यंत सखोल आणि ओघवत्या शैलीत उलगडला. त्यांच्या आत्मकथनातून स्वातंत्र्यपूर्व काळ व स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभिक काळाचे जिवंत चित्र उपस्थितांसमोर उभे राहिले.

पांडे सरांनी सांगितलेले शिक्षणातील अनुभव, आयुष्यातील संघर्ष आणि विशेषतः त्यांच्या बहिणीच्या लग्नाचा प्रेरणादायी किस्सा श्रोत्यांच्या मनाला भिडला. ८८ वर्षांच्या वयातही त्यांची स्मरणशक्ती आणि विचारांची सुसूत्र मांडणी पाहून



उपस्थित मंत्रमुग्ध झाले. त्यांच्या बोलण्यातून "पुस्तकं माणसाला प्रगल्भ बनवतात, विचारांना समृद्ध करतात आणि जातीपातीच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची दृष्टी देतात" हा महत्त्वपूर्ण संदेश मिळाला.

योगेश्वरी शिक्षण संस्था, न्यायालयीन अनुभव आणि अंबाजोगाईतील राजकारण यांसारख्या काही महत्त्वाच्या आठवणी वेळेअभावी मांडता आल्या नाहीत. त्यामुळे पुढील शनिवारी "मेरी बात" चा दुसरा भाग आयोजित करण्याचा निर्णय उपस्थितांनी एकमताने घेतला असून, पुन्हा एकदा पांडे सरांना ऐकण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी अनिकेत डिघोळकर यांच्या हस्ते ॲड. प्रा. गोविंदराव पांडे यांचा पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन व संचालन व्यंकटेश जोशी यांनी केले.

# माजलगावचा पाणी प्रश्न सुटणार · 98.77 कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ

## पाणीपुरवठा योजना वर्षभरात सुरू होणार : आ. सोळंके

तभा. वृत्तसेवा

**माजलगाव प्रतिनिधी** | शहरवासीयांच्या जिव्हाळ्याचा पाणीप्रश्न आता कायमचा मार्गी लागणार आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत ९८.७७ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ करण्यात आला. ही योजना अवघ्या ११ ते १२ महिन्यांत पूर्ण होऊन शहरात नियमित व शुद्ध पाणीपुरवठा सुरू होईल, असे आमदार प्रकाश सोळंके यांनी यावेळी सांगितली.

या योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्र व ४ नवीन जलकुंभांच्या भूमिपूजन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी बाबुराव पोटभरे होते. यावेळी माजी आमदार मोहनराव सोळंके, डी. के. देशमुख, नगराध्यक्षा शिफा बिलाल चाऊस, नारायण डक, उपनगराध्यक्ष सहाल चाऊस, मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ.प्रकाश सोळंके पुढे म्हणाले की, प्रशासकीय काळात ही योजना कार्यान्वित झाली असली, तरी जलकुंभांसाठी जागा उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे काम सहाल

चाऊस यांनी केले. या योजनेमुळे शहरातील प्रत्येक घरापर्यंत शुद्ध पाणी पोहोचेल. तर मोहनराव सोळंके यांनी योजना पूर्ण होईपर्यंत देखभालीची गरज व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात बाबुराव पोटभरे यांनी केवळ कामे आणणे म्हणजे विकास नसून, ती दर्जेदार करून घेणे हा खरा विकास असल्याचे सांगत गुत्तेदाराला कामाच्या गुणवत्तेबाबत सूचना दिल्या.

प्रास्ताविक उपनगराध्यक्ष सहाल चाऊस यांनी केले. कार्यक्रमाला अभियंता मारुती गीते, श्रीहरी मोरे, नवनाथ धाईजे, बिलाल चाऊस यांच्यासह सर्व नगरसेवक, नगर परिषद कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन मनोहर डाके यांनी केले, तर आभार मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी मानले

# स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरात विद्यार्थ्यांचा सत्कार



तभा. वृत्तसेवा

**केज दि ११(प्रतिनिधी)** | शाळेतील ७ विद्यार्थ्यांची राजर्षी शाहू महाविद्यालय व संत तुकाराम महाविद्यालय लातूर येथे स्क्रीनिंग टेस्ट द्वारे निवड विद्यार्थ्यांचा शुक्रवार रोजी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष जीबी गदळे प्रमुख पाहुणे डॉ हनुमंत सौदागर, संस्थेचे उपाध्यक्ष नईमोद्दीन इनामदार ,मुख्याध्यापक वसंत शितोळे आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ सौदागर म्हणाले अभ्यासाने सर्व काही शक्य होते.ध्येयपूर्तीसाठी सातत्य पूर्वक प्रयत्न केल्यास यश निश्चित प्राप्त होते असे मत व्यक्त केले. राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये- श्रावण रामदास चाटे, आकांक्षा दीपक सांजुरे, प्रज्ञा दिनकर घुले, श्रेयश रघुनाथ बनसोडे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तर संत तुकाराम महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये- सई बालाजी साखरे, ज्ञानदा सुनील गायकवाड, आयुष जयप्रकाश सातपुते यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# नायगाव येथे जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा

## कार्यक्रमातून नागरिकांना निरोगी जीवनशैलीचा दिला संदेश

तभा. वृत्तसेवा

**केज, प्रतिनिधी** | वर्ल्ड हेल्थ डे निमित्त आयुष्मान आरोग्य मंदिर धनेगाव अंतर्गत नायगाव येथे जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरीत आरोग्यविषयक घोषवाक्ये देत माझे गाव आरोग्य संपन्न गाव, स्वच्छता, योग्य आहार, नियमित व्यायाम,क्षयरोग, व HPV लसीकरणाचे महत्त्व पटवून देण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील गोरमाळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात




आले.या प्रसंगी पुढील मान्यवर व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील गोरेमाळी,सरपंच विवेक खोडसे,आरोग्य सेवक मणियार कैफ, आरोग्य सेविका अनुराधा शिंदे, आशा स्वयंसेविका संध्याताई मुजमुले ,अंगणवाडी सेविका,मुमताज शेख,अभिलाषा मुजमुले, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब गोरे,यांच्यासह इतर शिक्षक बांधव यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ कार्यक्रमात सहभागी झाले होते. या उपक्रमातून नागरिकांना निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर नगरपरिषद कर्मचाऱ्यांना वेतन व महागाई भत्ता अदा

## स्वच्छता कंत्राटी कर्मचाऱ्यांचे साडेतीन महिन्यांचे 1 कोटी 16 लाख रुपये वेतन प्रदान, रमाई घरकुल योजनेअंतर्गत 154 लाभार्थ्यांना 1 कोटी 1 लाख 81 हजार 250 रुपये निधी वर्ग

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ, प्रतिनिधी** | नगर परिषद कर्मचाऱ्यांना दर महिना वेतन करण्यासाठी सहाय्यक अनुदान प्राप्त होत असते मात्र मार्च महिन्याचे सहाय्यक अनुदान प्राप्त नसतानाही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर ना.पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी नगरपरिषदेच्या आस्थापनेवरील अधिकारी ,कर्मचारी यांचे मार्च महिन्याचे वेतन व महागाई भत्ता अदा करण्यात आला आहे.. त्याचबरोबर स्वच्छता कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतनापैकी साडे तीन महिन्याचे वेतनही या कामगारांना प्रदान करण्यात आले आहे. त्याचबरोबर रमाई घरकुल योजनेअंतर्गत तब्बल १५४ लाभार्थ्यांचे निधी यांच्या खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. यामुळे न. प. कर्मचाऱ्यांमध्ये आनंद व्यक्त होत असून नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, मुख्याधिकारी व अधिकाऱ्यांचे आभार मानून सत्कार केला आहे.

परळी वैजनाथ नगर परिषदेने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती पूर्वी वेतन द्यावे अशी कर्मचारी तसेच स्वच्छतेच्या कंत्राटी कामगारांची मागणी होती. या अनुषंगाने ना. पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद आस्थापनेवरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन त्यांना प्रदान करण्यात आले आहे. त्याचबरोबर आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता



एकूण १८ लाख रुपये अदा करण्यात आले आहेत. नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागात कंत्राटी कामगार म्हणून काम करणाऱ्या कामगारांच्या थकीत वेतनापैकी साडेतीन महिन्याचे थकीत वेतन एकूण सुमारे एक कोटी १६ लाख रुपये अदा करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे रमाई घरकुल योजनेअंतर्गत तब्बल १५४ लाभार्थ्यांचे एक कोटी एक लाख ८१ हजार २५० रुपये लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या अनुषंगाने परळी वैजनाथ नगरपरिषद नियमक मंडळ व प्रशासनाने अधिकारी ,कर्मचारी, कामगार तसेच रमाई घरकुल योजनेचे लाभार्थी नागरिक यांना स सुखावह अशा प्रकारची भूमिका घेतल्याबद्दल आनंद व्यक्त होत आहे. याबद्दल नगरपरिषद कर्मचारी संघटनेच्या वतीने नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पोपट निगळ, नगरसेवक नितीन रोडे,उपमुख्य अधिकारी संतोष रोडे, न.प.चे लेखापाल सचिन पोकळे, न. प.चे वेतन विभाग प्रमुख व अंतर्गत लेखापाल अजयकुमार कलंत्री यांचे आभार व्यक्त करून त्यांचा सत्कार केला आहे.

**राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघटनेच्या वतीने सत्कार** | दरम्यान, राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघटनेच्या वतीने वेतन व महागाई भत्ता डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती पूर्वी द्यावा अशा प्रकारचे निवेदन देऊन मागणी करण्यात आली होती. या मागणीची तात्काळ दखल घेत नगराध्यक्षा व नगरपरिषद प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्याबद्दल संघटनेच्या वतीने नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, मुख्याधिकारी निगळ, उपमुख्य अधिकारी संतोष रोडे , वेतन विभाग प्रमुख अजयकुमार कलंत्री, सचिन पोकळे, गणेश निकम आदी अधिकारी वर्गाचा आभार मानून सत्कार केला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष प्रशांत जगतकर व सचिव विशाल बनसोडे यांच्यासह सर्व कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## फुले जयंतीनिमित्त रुग्णांना फळवाटप; सेवाभावाचा संदेश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ एप्रिल -**



महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त राजर्षी शाहू बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा स्त्री रुग्णालय येथे गरजू रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा उज्वला शिंदे यांनी महापुरुषांचे विचार कृतीत उतरवणे हीच खरी आदरांजली असल्याचे सांगत, समाजात संवेदनशीलतेचा संदेश देण्याचा प्रयत्न असल्याचे नमूद केले. या उपक्रमातून समता, बंधुता व सेवाभावाचा संदेश देण्यात आला.

यावेळी सचिव रमेश पाटील, सदस्या ज्योतीराजे निंबाळकर, भंडारे व इतर मान्यवर उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### योगेश शर्मा यांचा प्रा. गिते यांच्याकडून सत्कार

**भूम, दि.१२ एप्रिल -**
बँक ऑफ महाराष्ट्र, ईट शाखेतील उपशाखा व्यवस्थापक योगेश शर्मा यांनी मागील चार वर्षांत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. नुकतीच त्यांची पुणे येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या मुख्य कार्यालयात बदली झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रा. ज्ञानेश्वर गीते यांच्या वतीने योगेश शर्मा यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्यकाळात ग्राहकसेवा, बँकिंग व्यवहारातील पारदर्शकता आणि सर्वसामान्यांशी जुळवून घेतलेले सुसंवाद यामुळे त्यांनी विशेष छाप पाडली. या कार्यक्रमाला उपसरपंच सुग्रीव लिमकर, समाधान माने, अशोक चव्हाण यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.




### नळदुर्गमध्ये पुण्यतिथीनिमित्त मोफात पाणपोईचा शुभारंभ

**नळदुर्ग, दि.१२ एप्रिल -**
नळदुर्ग येथील हभप.कै. तुळशीराम मुळे यांच्या पाचव्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या स्मरणार्थ चंद्रकांत मुळे यांच्या वतीने मोफत पाणपोई सुरू करण्यात आली. ही पाणपोई नळदुर्ग बसस्थानकासमोरील हॉटेल गौरी शेजारी रविवार, दि.१२ एप्रिल रोजी सुरू करण्यात आली. या पाणपोईचे उद्घाटन निवृत्त शिक्षक तथा स्वातंत्र्य सेनानी बलभीमराव मुळे गुरुजी, शिवाजीराव मिटकर आणि तानाजी जाधव यांच्या हस्ते नारळ वाढवून व फलकाचे पूजन करून करण्यात आले. यावेळी बलभीमराव मुळे गुरुजी यांनी हभप. कै. तुळशीराम मुळे यांनी वारकरी संप्रदायासाठी केलेल्या कार्याची माहिती देत त्यांच्या सेवेचा गौरव केला. या प्रसंगी भीमाशंकर बताले, अमोल सुरवसे, भगवंत सुरवसे, शिरीष डुकरे, विजय डुकरे, विशाल डुकरे, सुजित बिराजदार, सागरसिंह हजारे, डी.एम. खाटमोडे, आकाश मुळे आदी उपस्थित होते.



### ज्ञानेश्वरी ग्रंथांचे बहुला येथे वाटप

**कळंब, दि.१२ एप्रिल -**
तालुक्यातील बहुला येथे हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या समाधीला ७५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विशेष उपक्रम राबविण्यात आला. कै. त्रिंबक बिक्कड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे पुत्र अनिल, सुनील व विष्णू बिक्कड (पुणे) यांनी २५० ज्ञानेश्वरी ग्रंथ व सार्थ हरिपाठाचे वाटप केले. हा कार्यक्रम हभप. प्रदीप यादव महाराज, मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड व मान्यवरांच्या हस्ते पार पडला. उपस्थितांनी या धार्मिक व समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक केले. तसेच ज्ञानेश्वरीचे वाचन करून संतांच्या विचारांनुसार जीवन जगण्याचे आवाहन करण्यात आले.



### जवाहर नवोदय विद्यालयात महात्मा फुले जयंती उत्साहात

**तुळजापूर, दि.१२ एप्रिल -**
येथील जवाहर नवोदय विद्यालयात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती ११ एप्रिल २०२६ रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. प्रभारी प्राचार्य डी.व्ही. बडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी एस.डी. खोब्रागडे, एस.एस. माने, एच.जी. जाधव, पी.एन. जोशी, एस.डी. वाघमारे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नववीतील विद्यार्थी सार्थक घुगे याने फुले यांच्या शिक्षणविषयक धोरणावर विचार मांडले. एस.एस. माने यांनी फुले यांचा समाजसुधारणेतील लढा अधोरेखित केला, तर प्राचार्य बडे यांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या साहित्याचे वाचन करण्याचे आवाहन केले.

### ठाकूर यांचे स्पर्धा परिक्षेत यश

**धाराशिव, दि.१२ एप्रिल -**
उमरगा तालुक्यातील केसर जवळगा येथील सुपुत्र आशिष विक्रमसिंह ठाकूर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) स्पर्धा परीक्षेत यश मिळवत आदिवासी विकास विभागातील 'सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण)' पदावर निवड मिळवली आहे.

## जिल्ह्याची 'मागास' अशी ओळख पुसून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्धार...

# धाराशिव नाट्यगृहासाठी ५ कोटींचा निधी तात्काळ मंजुर

## न.प.च्या भंगार नाट्यगृहाची दुरावस्था पासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा...

### मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात ५६७ निर्णय घेतले.. लाडकी बहीण' योजना कधीही बंद होणार नाही...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ एप्रिल -**
धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहासाठी तात्काळ ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करत असल्याची घोषणा करत मी विमानाने परत जाण्यापूर्वीच याबाबतचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांना मिळेल, असे सांगत त्यांनी प्रशासनाला तात्काळ कार्यवाहीचे निर्देश देत 'लाडकी बहीण' योजना कोणत्याही परिस्थितीत बंद होणार नसल्याचे ठामपणे सांगत, राज्यात कुणीही आले तरी ही योजना सुरूच राहील, राज्याच्या विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

धाराशिव येथील पत्रकार संघाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी विविध महत्त्वपूर्ण घोषणा करत सरकारच्या धोरणांची माहिती दिली.



मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात ५६७ निर्णय घेतल्याचे सांगत शिंदे म्हणाले की, या निर्णयांचा थेट लाभ सर्वसामान्य नागरिकांना झाला आहे.

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांवर सरकार कार्यरत असल्याचे सांगत त्यांनी जनतेच्या हितालाच प्राधान्य दिले असल्याचे स्पष्ट केले. मला काय मिळाले यापेक्षा राज्यातील जनतेला काय मिळाले, हे महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी नमूद केले. आपत्ती काळात तसेच विविध शासकीय योजनांद्वारे नागरिकांना मदत करण्याचे काम सातत्याने सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

धाराशिव जिल्ह्याची 'मागास' अशी ओळख पुसून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

मराठवाड्यातील दुष्काळाचा प्रश्न संपवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार यासाठी तत्पर असल्याचे नमूद केले. पाणी प्रश्नावर बोलताना त्यांनी अडीच वर्षांत १७५ सुप्रमा दिल्याचे सांगितले.

पत्रकारांच्या भूमिकेचे कौतुक करताना शिंदे म्हणाले की, पत्रकार हा समाजाचा जागता पहारेकरी आहे. कोविड काळात पत्रकारांनी मोठे काम केले याबाबत कौतुक ही केले.

या कार्यक्रमास पालकमंत्री प्रताप सरनाईक, मा.खा. रवींद्र गायकवाड, मा.आ. ज्ञानराज चौगुले, मा.आ. संगीता ठोंबरे, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा म्हाडादळकर, नगर पालिकेच्या मुख्याधिकारी वसुदा फड, शिवसेना पदाधिकारी तसेच जिल्ह्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परंडा येथे भाजपा कार्यालयात महात्मा फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१२ एप्रिल -**
महिला शिक्षण आणि समानतेच्या अधिकारासाठी आयुष्यभर लढणारे सामाजिक क्रांती आणि स्त्री शिक्षणाचे



प्रणेते क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त परंडा येथे भाजपा संपर्क कार्यालयात भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष उमाकांत गोरे, उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, नगरसेवक सत्तार पठाण, ॲड. जहीर चौधरी, विकास कुलकर्णी, विलास गायकवाड, साहेबराव पाडुळे, परसराम कोळी, रामकृष्ण घोडके, सुरज काळे, जयंत भातलवंडे, जोती भातलवंडे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## ऐन उन्हाळ्यात दिवसभर वीजगुल; नागरिक त्रस्त, महावितरणवर संताप




**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१२ एप्रिल -**
धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तेरखेडा गावात ऐन उन्हाळ्यात वीजपुरवठ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असून, महावितरण प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार होणाऱ्या वीज खंडितामुळे नागरिकांना उकाड्यात प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना नागरिकांनी कुलर व पंखे मोठ्या प्रमाणात खरेदी केले आहेत. मात्र सततच्या वीज खंडितामुळे ही साधने निरुपयोगी ठरत असून नागरिकांचे आर्थिक नुकसानही होत आहे.

तेरखेडा हे औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे गाव म्हणून ओळखले जाते. येथे फटाका व्यवसायासह विविध उद्योग मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. त्यामुळे व्यापाऱ्यांची खरेदी-विक्रीसाठी सतत ये-जा सुरू असते. मात्र वीजपुरवठा खंडित होत असल्याने ऑनलाईन व्यवहार, बँकिंग सेवा आणि इतर डिजिटल सुविधा ठप्प होत आहेत.

गावात मोबाईल टॉवर असतानाही वीज गेल्यावर इन्व्हर्टरची सुविधा नसल्याने नेटवर्क पूर्णपणे बंद पडते. परिणामी नागरिकांना संपर्क साधण्यातही मोठ्या अडचणी येत आहेत.

दरम्यान, या गंभीर समस्येची दखल घेत दोन-तीन दिवसांपूर्वी मतदारसंघाचे आ. तानाजीराव सावंत यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून वीजपुरवठा तात्काळ सुरळीत करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र त्यांच्या सूचनांनंतरही प्रत्यक्ष परिस्थितीत कोणताही बदल झालेला दिसून येत नाही.

गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न कायम असूनही महावितरण प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये तीव्र होत आहे. तेरखेडा येथील वीजपुरवठा तात्काळ सुरळीत करावा, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## सामाजिक समता सप्ताहात वडगावात विविध उपक्रम; ५२ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ एप्रिल -**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, धाराशिव यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त तसेच क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त ८ ते १४ एप्रिल दरम्यान जिल्ह्यात 'सामाजिक समता सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत दि.११ रोजी वडगाव (ता. धाराशिव) येथे विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, स्वच्छता अभियान तसेच प्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात आले. विशेष म्हणजे ५२ तरुणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले, तर ९८ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाला समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सचिन कवले, समाज कल्याण अधिकारी सनम लामकने, मुरूम नगरपरिषदेचे नगराधिकारी सचिन भुजबळ, प्रमुख व्याख्याते किरण सगर, बार्टीचे प्रकल्प अधिकारी तुषार कदम, नागेश फुलसुंदर, किरण चिंचोले, रमेश नरवडे, गणेश मोटे, गोविंद लोमटे, सुहास वाघमारे, अर्चना रणदिवे यांच्यासह गावातील उपसरपंच बबन फुलसुंदर, शालेय समिती अध्यक्ष सचिन पवार, सदस्य सतीश पाटील उपस्थित होते. यावेळी सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी विविध शासकीय योजनांची माहिती देत नागरिकांनी त्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. त्यांनी मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, स्वाधार योजना, ॲट्रॉसिटी कायदा, बचत गटांना ट्रॅक्टर वाटप, जात पडताळणी आदी योजनांबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश फुलसुंदर यांनी केले, प्रास्ताविक तुषार कदम यांनी तर आभार ग्रामसेवक जी. व्ही. करदोरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती, विशेषतः महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

## डोकेवाडी येथे अखंड हरीनाम सप्ताह १८ एप्रिलपासून

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१२ एप्रिल -**
तालुक्यातील डोकेवाडी येथे गेल्या ५९ वर्षांपासून सुरू असलेल्या अखंड हरीनाम सप्ताहाचा यंदाचा ५९ वा सोहळा १८ एप्रिलपासून सुरू होणार असून २५ एप्रिल रोजी महाप्रसादाने सांगता होणार आहे.

गुरुवर्य कै. यशवंत महाराज आंद्रुड व कै. भगवान दिवटे यांच्या आशीर्वादातून सुरू झालेल्या या परंपरेत यंदा हभप. अर्जुन शिंगाडे यांच्या अध्यक्षतेखाली सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार असून शेवटच्या दिवशी महाप्रसाद व अन्नदान कार्यक्रम माजी आमदार राहुल मोटे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सप्ताह समितीने केले आहे.

## महिलांच्या सन्मानाचा प्रश्न : कळंबमध्ये सार्वजनिक शौचालय बंद, नागरिक त्रस्त!



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१२ एप्रिल -**
कळंब येथील प्रशासकीय इमारतीत अधिकारी वर्गासाठी सर्व सुविधा उपलब्ध असताना, सामान्य नागरिक-विशेषतः महिलांना- शौचालयासारख्या मूलभूत सुविधेसाठी वणवण भटकावे लागत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. बंद अवस्थेतील सार्वजनिक शौचालय प्रशासनाच्या दुर्लक्षाचे जिवंत उदाहरण ठरत असून, महिलांची मोठी कुचंबणा होत आहे.

महिला सन्मान, स्वच्छता आणि आरोग्य याबाबत मोठमोठ्या घोषणा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात महिलांना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी ठोस पावले उचलली जात नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे केवळ आश्वासनांवर न थांबता तातडीने कृती करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. येथील तहसील कार्यालय व मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला असला, तरी सामान्य नागरिकांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा अद्याप अपुऱ्या आहेत. विशेषतः महिला व पुरुषांसाठी सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था नसल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. स्थळ पाहणीदरम्यान शौचालयासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यात आलेली दिसून आली; मात्र त्या शौचालयाला कुलूप लावलेले असल्याने ती सुविधा प्रत्यक्षात वापरात नसल्याचे स्पष्ट झाले. परिसरात वाढलेले गवत, स्वच्छतेचा अभाव आणि एकूणच दुर्लक्ष यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. दरम्यान, प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी कार्यालयात अटॅच शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे. मात्र रोज विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी कोणतीही सोय नसल्याने महिलांना विशेषतः अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे नाराजी व्यक्त करत, शौचालय बांधले आहे, तर ते नागरिकांसाठी खुले का नाही? असा सवाल उपस्थित केला आहे. शौचालय सुरू करून त्याची नियमित स्वच्छता व देखभाल करण्याची मागणीही नागरिकांनी केली आहे.

## येडेश्वरी देवी यात्रेत गोंधळ; पोलीस प्रशासनावर निष्क्रियतेचे आरोप, ग्रामस्थ संतप्त

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१२ एप्रिल -**
येथील श्री येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा दि.२ ते ७ एप्रिल दरम्यान विविध धार्मिक उपक्रमांनी पार पडली. मात्र राज्यातील दुसऱ्या क्रमांकाच्या, सुमारे १५ लाख भाविकांच्या या यात्रेत पोलीस प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे वाहतूक कोंडी, मारहाण, दरोडेखोरी आणि दादागिरीच्या घटनांनी मोठा गाजावाजा निर्माण झाला आहे.

यात्रेदरम्यान झालेल्या घटनांमुळे ग्रामस्थ, पुजारी आणि मानकरी संतप्त झाले. मंगळवारी रात्री घुगरी महाप्रसादानंतर देवीची पालखी मुख्य मंदिराकडे जात असताना पालखीच्या खांदेकऱ्याला दर्शनासाठी अडवून काही जणांनी मारहाण केली. या घटनेनंतर ग्रामस्थांनी संतप्त होत पोलीस प्रशासनाविरोधात रास्ता रोको केला. शेवटी दोन आरोपींवर गुन्हा दाखल झाल्यानंतरच परिस्थिती निवळली. यानंतरही काही गुंड प्रवृत्तीच्या ७०-८० जणांनी गावातून रॅली काढत शिवीगाळ करून वातावरण भडकवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे या रॅलीच्या मागे पोलिसांच्या गाड्या असल्याचे सांगितले जात असून, यामुळे पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यात्रेदरम्यान पशुप्रदर्शन, आराधी गाणी, कुस्ती दंगल, शोभेची आतषबाजी आणि घुगरी महाप्रसाद हे कार्यक्रम निर्विघ्न पार पडले. मात्र वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाला. बंदोबस्ताअभावी तब्बल १० तास दोन महामार्ग ठप्प राहिले, त्यामुळे भाविकांसह रुग्ण आणि प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला.

### ग्रामस्थ व मानकऱ्यांच्या प्रतिक्रिया...

पोलीस प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे यात्रेकरूंना त्रास झाला. लूटमार आणि अवैध धंदे रोखण्यात अपयश आले. पुढील नियोजन ग्रामसभेत ठरवणार.
**- गणेश बारकुल** उपसरपंच)

वरिष्ठ अधिकारी उपस्थित नसल्याने बंदोबस्ताचे नियोजन चुकले. यापुढे वरिष्ठांनी स्वतः लक्ष देणे गरजेचे आहे.
**- समाधान बेदरे**(देवस्थान ट्रस्ट)

पालखी मार्गावरही वाहनांची गर्दी होती. साधे पेट्रोलिंगही झाले नाही, त्यामुळे कोंडी वाढली.
**- अमोल पाटील** (मानकरी)

यंदा मी यात्रेत उपस्थित नव्हतो, त्यामुळे नेमकी कारणे सांगता येणार नाहीत.
**- हेमंत ढोकले** (तहसीलदार)

पोलीस व अवैध व्यावसायिकांमध्ये साटेलोटे असल्याचा संशय आहे. यावर नियंत्रण आवश्यक.
**- राहुल पाटील** (शिवसेना उबाठा)

पावसामुळे आणि भाविकांची संख्या वाढल्याने वाहतूक कोंडी झाली. ग्रामपंचायतीने पार्किंगची व्यवस्था करणे आवश्यक आहे.
**- तात्या भालेराव** (सहायक पोलीस निरीक्षक)

यात्रा काळात चोरी, लुटमार आणि खिसेकापूंच्या घटनांमध्येही वाढ झाली. भाविकांच्या गळ्यातील दागिने चोरले गेले, तर काहींना अंधाराचा फायदा घेत लुटण्यात आले. अवैध दारू विक्री, जुगाराचे अड्डे यावर कारवाई न झाल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

# आशाताईंची नांदेड भेटीची इच्छा अपूर्णच राहिली!

## खा. अशोक चव्हाण यांनी दिला आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १२ एप्रिल -**

मला नांदेडला यायचं आहे, गुरुद्वारात दर्शन घ्यायचे आहे. आपण लवकरच कार्यक्रम ठरवूया, असा शब्द देणाऱ्या स्वरसम्राज्ञी आशाताई भोसले यांची नांदेड भेटीची इच्छा अखेर अपूर्णच राहिली. त्यांच्या निधनामुळे संगीत विश्वाचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे, अशा शब्दांत राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

आशाताईंच्या निधनानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना श्रद्धांजली अर्पण करताना खा. चव्हाण यांनी त्यांच्याशी असलेल्या स्नेहबंधांना उजाळा दिला. ९०



च्या दशकात आशाताई नांदेडला आल्या होत्या. त्यानंतर पुन्हा एकदा सचखंड गुरुद्वारात दर्शनासाठी येण्याची त्यांची तीव्र इच्छा होती, असेही त्यांनी नमूद केले. खा. चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये एका खास प्रसंगाचा उल्लेख केला आहे. कोरोना काळानंतर आमचे एक स्नेही प्रसाद महाडकर यांचा फोन आला आणि त्यांनी आशाताईंशी बोलणे करून दिले. त्यांनी नांदेडला येण्याची इच्छा बोलून दाखवली. मी देखील आनंदाने त्यांना निमंत्रण दिले, मात्र नियतीला हे मान्य नव्हते आणि तो योग कधीच जुळून आला नाही, अशी हळहळ त्यांनी व्यक्त केली.

नांदेडच्या सांस्कृतिक वैभवात भर टाकणाऱ्या 'संगीत शंकर दरबार' या प्रतिष्ठित कार्यक्रमासाठी देखील आशाताईंना निमंत्रित केले होते. नांदेडकरांना त्यांचे जादुई सूर प्रत्यक्ष ऐकता यावेत, अशी माझी इच्छा होती. परंतु, त्यावेळी प्रकृती अस्वास्थ्यामुळे आशाताईंना येता आले नाही. त्यांच्या निधनामुळे ही संधी आता कायमचीच हुकल्याची सल खा. चव्हाण यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केली आहे.

# निष्क्रिय प्रशासनाचा फटका; पगाराअभावी विश्रामगृहाला कुलूप

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. १२ एप्रिल -**

नायगांव तालुक्यातील महत्त्वाच्या ठिकाणा पैकी राज्य महामार्गाच्या मुख्य ठिकाणी स्थापित असलेल्या नरसीतील शासकीय विश्रामगृहात प्रशासनाने निष्क्रियतेचा कळस गाठला असून, येथील कर्मचार्यांना तब्बल चार महिन्यांपासून वेतन न मिळाल्या ने संतप्त कर्मचाऱ्यांनी रविवारी दि.१२ एप्रिल पासून विश्रामगृहाला कुलूप ठोकत आंदोलनाचा मार्ग स्विकारला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून शासनाच्या बेफिकीर कारभारावर संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दाभोळकर यांच्या शताक्षी कंपनीचा करार डिसेंबर २०२५ मध्ये संपल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नायगांव यांच्याकडे सोपवण्यात आले. मात्र नायगांव तालुक्यातील बांधकाम विभागाचे उपअभियंता गणेश बारसकर यांनी वारंवार आश्वासने देऊनही प्रत्यक्षात एकाही कर्मचाऱ्याला अद्याप वेतन मिळालेले नाही.परिणामी,आर्थिक विवंचनेत सापडले ल्या कर्मचाऱ्यांचा संयम अखेर तुटला. या विश्रामगृहात दररोज येणारे लोकप्रतिनिधी, अधिकारी, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांसाठी ही जागा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. मात्र, विश्राम गृहच बंद झाल्याने सर्वसामान्यांसह मान्यवरांनाही गैर सोयीचा सामना करावा लागत असून, प्रशासनाच्या नियोजनशून्यतेचे दर्शन घडत आहे.



जोपर्यंत आमचे थकीत वेतन मिळत नाही, तोपर्यंत विश्रामगृह सुरू होणार नाही, असा ठाम इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. त्यामुळे ही परिस्थिती आणखी चिघळण्याची चिन्हे दिसत असून प्रशासनासमोर गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे.

दरम्यान, या प्रकारामुळे शासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून,जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, तसेच कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन त्वरित अदा करावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. जिल्हाधिकारी, वरिष्ठ अधिकारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी तातडीने हस्तक्षेप करून या प्रश्नाला मार्गी लावावे, अन्यथा जन आक्रोश उफाळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग या गंभीर प्रकरणाकडे किती तत्परतेने लक्ष देतो, याकडे सध्या सर्वांचे लक्ष लागून आहे.



## महापौर कविता मुळे यांनी घेतला मनपा आरोग्य केंद्राचा आढावा


**नवीन नांदेड** -नांदेड महानगरपालिकेच्या महापौर कविता मळे व आरोग्य समिति यांनी सिडको मनपा येथील मातृसेवा आरोग्य केंद्रास भेट देऊन येथील आरोग्य सुविधा व कामकाजा विषयीचा आढावा घेण्यात आला. मातृसेवा आरोग्य केंद्र सिडको मनपा आरोग्य केंद्रास दिनांक ११ एप्रिल रोजी नांदेड महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे व आरोग्य समिती यांनी सिडको येथील दवाखान्यास भेट देऊन येथील कामकाजाचा व सुविधांचा आढावा घेण्यात आला. या आढावा मध्ये असे दिसून आले की या ठिकाणी एकही महिला वैद्यकीय अधिकारी नसल्याचे दिसून आले. आरोग्य केंद्रास विस्तृत अशा प्रकारे जागा असूनही या ठिकाणी योग्य त्या सुविधा नसल्याचे दिसून आले यापूर्वी या दवाखान्यात आयपीडी बरोबर प्रसूतीगृह अशा प्रकारच्या प्राथमिक सुविधा नसल्याचे दिसून आले. महिला डॉक्टर व बालरोग तज्ञ डॉक्टर तसेच प्रसूतीगृहाची मागणी करण्याचे आदेश संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याकडे महापौर यांनी केले. यावेळी नांदेड महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे, महिला व बालकल्याण सभापती सोनी पाटील, नगर सेवक अंकुश देवसरकर,नगरसेवक सुवर्णा बसवदे, सतीश बसवदे ,आरोग्य अधिकारी डॉ.हनुमंत रिठे, यांनी सिडको दवाखाना येथे भेट देऊन कामाचा व सुविधांचा आढाव घेण्यात आला. या आरोग्य केंद्राला डॉ.महिला डॉ.बालरोगतज्ज्ञ प्रसूतीगृहासह त्याला लागणाऱ्या अत्याधुनिक सुविधा व तज्ञ डॉ यांची मागणी डॉ.संतोष शिंदे आणि कर्मच्यांनी केली याच वेळी महापौर यांनी महात्मा फुले जयंती निमित्त महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच अशा वर्कर शितल लोखंडे यांनी आरोग्य केंद्रास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य प्रतिमा भेट देण्यात आली या प्रतिमेचेही अनावरण महापौर यांच्या हस्तेकरण्यात आले. सदरील बैठकीस डॉ संतोष शिंदे. यांच्यासह सिडको आरोग्य केंद्राचे विष्णुकांत गलपवाड ,आरोग्य परिचारिका प्रियांका रच्वेवार, जयश्री दरेगाव, मीनाक्षी शिंदे व औषध निर्माण अधिकारी ओंकार सूर्यवंशी व सर्व आशा वर्कर यांची उपस्थिती होती.

## डॉ. बी आर आंबेडकर फाऊंडेशनचे पुरस्कार जाहीर

**नांदेड** -महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने मागील २४ वर्षापासून डॉ.बी.आर. आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने पत्रकारिता क्षेत्र तसेच सामाजिक, राजकीय शिक्षण, सांस्कृतिक, साहित्य, सहकार, आरोग्य या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते या वर्षाच्या पुरस्काराची घोषणा फाऊंडेशनचा सचिव म्हणून मी आकाश गजभारे या पत्रकार परिषदेत पुरस्कार प्राप्त मान्यवरांच्या नावाची घोषणा करीत आहे सन २०२५-२६ चे पुरस्कार यामध्ये महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक ज्येष्ठ कवी ज्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा व्दिापीठाचे गीत लिहिले आहे ते सर्वांचे परिचित डॉ. लक्ष्मीकांत तांबोळी सर यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आली. या पुरस्काराचे स्वरूप रोख २५००० आणि मानपत्र असणार आहे. तसेच या वर्षाच्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी इलेक्ट्रॉनिक मीडिया ए.बी.पी. माझा चे पत्रकार मिक्की घई यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात. पुरस्काराचे स्वरूप रोख २५००० आणि मानपत्र आहे. जिल्हास्तरीय पुरस्कारामध्ये मुक्तेश्वर पाटील, डॉ. मनोज गिमेकर, छायाचित्र पुरस्कार विजय होकर्णे, यांचा समावेश आहे. या पुरस्काराचे स्वरुप प्रत्येकी १० हजार रुपये रोख, मानपत्र असे असणार आहे. स्मृतिशेष मनोज गजभारे यांच्या स्मृतिला उजाळा देण्यासाठी यंदाचा' प्रज्ञावंत विद्यार्थी, पुरस्कार यूपीएससी उत्तीर्ण व्दिार्थी अतुल अनिल राजूरकर यांना चौथा पुरस्कार जाहीर करण्यात आला. पुढील वर्षी अर्थात २०२७ साली पुरस्काराच्या उपक्रमाला पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत मागील पंचवीस वर्षांमध्ये ज्या ज्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविले आहे त्या सर्वांचा यथोचित गौरव मानपत्र देऊन रौप्य महोत्सवी भव्य कार्यक्रमात करणार आहोत. तसेच सर्वांच्या स्मरणात राहील अशी एक स्मरणिका पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याचा संस्थेचा मानस आहे. गेल्या पंचवीस वर्षात ज्या मान्यवरांचा पुरस्कार देऊन गौरव झाला आहे. त्यांचा जीवनपट आणि या स्मरणिकेच्या माध्यमातून जनतेसमोर आणणार असल्याचे सांगण्यात आले.

## माजी सैनिक अरूण नारलावाड नांदेड पोलीस दलात

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम रूद्रापूर येथील माजी सैनिक अरूण नागोराव नारलावाड यांची नांदेड पोलीस दलात पोलीस शिपाई पदी निवड झाली आहे.नारलावाड हे विविध राज्यात सैन्य दलात आपली सेवा बजावून सेवानिवृत्त झाले होते.नुकत्याच पार पडलेल्या पोलीस भरती प्रक्रियेत त्यांची माजी सैनिकांसाठीअसलेल्या आरक्षित जागेवर निवड झाली.त्यांनी मैदानी आणि लेखी चाचणीत ११३ गुण मिळविले.सौ.मंजुळाबाई हायस्कूल व ज्यूनिअर कॉलेज खतगांव येथील ते माजी विद्यार्थी आहेत. त्यांचे थोरले बंधू अशोक नारलावाड हे देखील नांदेड पोलीस दलात कार्यरत आहेत. या यशाबद्दल त्यांचे रूद्रापूर, बामणी,कासराळी,खतगांव, आदमपूर तसेच सैन्य दलातील कर्मचारीवर्ग,पोलीस कर्मचारी संजय चरकुलवार,अशोक नारलावाड,वनरक्षक सहदेव दोसलवार, रूद्रापूर ग्राम आजी माजी पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, गावकरी, मित्र परिवारासह तरूण भारत पत्रकार जाफर आदमपूरकर,सहशिक्षक संदीप बाळके, प्रकाश बुध्देवार, आर्मी ज्ञानेश्वर शिंदे,गोविंद जाधव,राजू पांचाळ,तलाठी विकास भंडारे,लक्ष्मण हांद्रे सूर्यकांत कांबळे, लक्ष्मण लमले,,ममारोती कांबळे आदिंनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



# प्रबोधनकारांच्या कडवटपणातूनच समाजाला दिशा मिळते ; गंगाधर बनबरे

**तभा वृत्तसेवा**
**फुलवळ, दि. १२ एप्रिल -**

प्रबोधनाच्या चळवळीत काम करतांना व समाजाला प्रगत दिशेने नेतांना प्रबोधनकारांना कटू शब्दात स्पष्ट बोलावेच लागते. त्यामुळे प्रबोधन करणाऱ्यांना गोड भाषा बोलता येत नाही पण समाजाला आजही प्रबोधनाची गरज असून प्रबोधनकारांच्या कडवटपणातूनच समाजाला दिशा मिळते असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे सुप्रसिद्ध व्याख्याते, लेखक गंगाधर बनबरे यांनी केले. ते नागलगावचे भूमिपुत्र तथा फुलवळ संकुलाचे केंद्रप्रमुख नामदेवराव कुट्टे यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमात बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड. बी. के. पांचाळ हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन माजी आ शंकरअण्णा धोंडगे, माजी आ. रोहिदास चव्हाण, माजी जि.प.अध्यक्ष दिलीप बेटमोगरेकर, नगराध्यक्ष शाहूराज नळगे, माजी सभापती प्रवीण पा. चिखलीकर, नगरसेवक सुधाकर कांबळे, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष संजय भोसीकर, ड. विजय धोडगे, एकनाथदादा पवार, ड. प्रफुल शेंडगे, कंत्राटदार वैजनाथ सादलापुरे, श्यामबापु देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. तसेच नुकतेच आकस्मिक निधन झालेले हभप मधुकर महाराज बारुळकर यांना उपस्थितीतांनी आदरांजली वाहिली.

यावेळी पुढे बोलतांना बनबरे म्हणाले की, संत तुकाराम, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज यांनी आयुष्यभर लोक प्रबोधनाचे काम केले. परंतु आज चाळीस चाळीस वर्षे सामाजिक चळवळीत राहून लोकहिताची काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची नोंद जर समाज घेत नसेल तर परिवर्तन हे कधीच होणार नाही. समाजाची आजची परिस्थिती जी बदलाची झाली आहे. पुढे गेली आहे. ती केवळ म. फुले यांच्या सामाजिक, शैक्षणिक क्रांतीमुळे म्हणुन तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखे कर्तबगार विद्यार्थी ही घडले. म्हणून शिक्षकांनी जर प्रबोधन करणे सोडले तर समाजाचे फार मोठे नुकसान होईल. नामदेवराव कुट्टे गुरूजी यांनी यापुढेही प्रबोधनाच्या या चळवळीत स्वतःला गुंतवुन घ्यावे. आज समाजातला माणुस हा आभाळा एवढा मोठा झाला असला तरी त्याची सावली जर समाजाला मिळत नसेल तर त्याचा काय फायदा..? पण तिळा एवढा माणुस जर समाजाच्या कामी येत असेल तर आभाळापेक्षा मोठा आहे. म्हणून सुशिक्षित माणसाने हे स्वतःला समाज सेवेच्या कामात स्वतःला जोडून घ्यावे. कारण समाज कार्य करतांना ज्ञानाची निर्मिती होते. ज्ञानाशिवाय आता कुणीच समाजाला वाचवु शकत नाही. तुम्ही पैसा खुप कमवाल पण कमवलेला पैसा टिकवायची सोय नसेल तर अज्ञानातुन दुःख निर्माण होते. म्हणुन समाजाचे अज्ञान दूर करायचे असेल तर शिव, फुले, शाहु, आंबेडकर यांच्या विचाराशिवाय पर्याय नाही असेही यावेळी बनबरे यांनी सांगितले.

याच मंचावरून नामदेवराव कुट्टे यांच्या जीवन प्रवासावरील गंगाधर बनबरे लिखित प्रबोधक नामक नामदेव कुट्टे गौरव ग्रंथ या पुस्तकाचे विमोचन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवश्री सौ. सविता कुट्टे आणि नामदेवराव कुट्टे यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

तसेच उपस्थित अनेक मान्यवरांनी आपापल्या मनोगतातून नामदेवराव कुट्टे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा मांडत त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याचाही गौरव केला.

यावेळी गणपतराव नाईक, तानाजी नाईक, पि.आर. ढवळे, भगवान पवार, मारोती मराशिवणे, नागोराव परिट, हेमंत थोटे, रघुनाथ नाईक, विलास कांबळे, एन.एम. कांबळे, युनुस शेख, गौतम ढवळे, ज्ञाणोबा गोमारे, भगवान चिवडे, बालाजी थोटे यासह सर्व कमिटीचे कार्यकर्ते, सहशिक्षक , केंद्रप्रमुख, गावकरी तथा सामाजिक कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितीन कोकाटे, सतिश देवकत्ते यांनी केले व अध्यक्षीय समारोप ड. पांचाळ मनोगताने झाला त्यानंतर उपस्थितांचे सत्कारमूर्ती नामदेवराव कुट्टे यांनी आभार मानले.

# विद्यापीठामध्ये महाड सत्याग्रह शताब्दी व जयंती महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १२ एप्रिल -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सप्ताहानिमित्ताने महाड सत्यागृह शताब्दी आणि महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव उत्साहात पार पडत आहे. आज शनिवार दि.११ एप्रिल, २०२६ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर हे होते. मुख्यवक्ते तेलंगाना न्यूज टीव्हीचे कार्यकारी संचालक तथा वरिष्ठ पत्रकार पाशम यादगिरी हे होते. विशेष उपस्थितीमध्ये प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, हैद्राबाद येथील कस्टमचे माजी अधीक्षक महेश्वर राज, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रशांत पेशकार, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, समन्वयक डॉ. सुनीता पाटील यांची उपस्थिती होती. दुसऱ्या सत्रामध्ये मुंबई येथील शाहीर चरण जाधव यांनी आंबेडकरी शाहिरी जलसा सादर केला.

सोमवार दि.१३ एप्रिल, २०२६ रोजी विद्यापीठातील ज्ञान स्त्रोत केंद्रामध्ये १८ तास अभ्यासाचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत विद्यार्थी व कर्मचारी अभ्यास करणार आहेत. मंगळवार, दि.१४ एप्रिल, २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून दि.१५ एप्रिल, २०२६ रोजी समारोप व पारितोषिक वितरण समारंभ पार पडणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते म्हणून नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे यांची उपस्थिती लाभणार आहे.

## सामाजिक समता सप्ताहांतर्गत संविधान जागर व महिला मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १२ एप्रिल -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह-२०२६ अंतर्गत आज १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता समाज कल्याण कार्यालय येथील सांस्कृतिक सभागृहात संविधान जागर व महिला मेळावा उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहायक आयुक्त शिवानंद मीनगिरे हे होते. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून महिला व मुलांकरिता सहाय्यक कक्ष, पोलीस मुख्यालय, नांदेड येथील समुपदेशक मोनिका वामन बिरादार उपस्थित होत्या. तसेच समाज कल्याण अधिकारी गजानन नरवाडे व वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक लक्ष्मी गायके यांचीही प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

# विना लिंकिंग रासायनिक खते द्या !

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. १२ एप्रिल -**

### भोकर सिड्स पेस्टिसाईड डिलर्स असोसियेशनची मागणी

येथील कृषी निविष्ठा धारकास कसल्याही प्रकारे विना लिंकींग शिवाय खते मिळत नाही शेतकऱ्यांना खते विक्रि करताना मोठी अडचण निर्माण होत आहे.यापूढे लिंकींगमध्ये खते मिळत असतील तर खते खरेदी करणार नाही.परिणामी तालूक्यात खताचा तूटवडा जाणवू शकतो अशा आशयाचे निवेदन भोकर तालूक्यातील सर्व कृषि निविष्ठा विक्रेत्यांनी जिल्हाधिकारी नांदेड यांना दिले आहे.रासायनिक खताचा पूरवठा सूरळीत विना लिंकिंग करुन दिल्यास खताचा तूटवडा पडणार नाही व शेतकऱ्यांना अडचण निर्माण होणार नाही खत विक्रेत्यांना लिंकिंगमूळे अनेक अडचणीला सामोरे जावे लागत असून यापूर्वी अनेकवेळा मागणी करुनही विना लिंकिंग शिवाय खते मिळत नाहीत परिणामी तालूक्यातील कृषि निविष्ठा विक्रेत्याला मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. रासायनिक खताचा पूरवठा सूरळीत करण्यासाठी विना लिंकिंग खताचा पूरवठा करुन देण्याची मागणी खत विक्रेते करित आहेत.प्रशासनाने मागणीचा विचार करुन खते विक्रेत्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी करीत आहेत.निवेदनाच्या प्रती जिल्हा कृषि अधिक्षक नांदेड जिल्हा कृषि अधिकारी जि.प.नांदेड तालूका कृषि अधिकारी भोकर गूणनियंत्रण अधिकारी भोकर आदिंना पाठवल्या आहेत.

# जगाला प्रकाशाकडे नेण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले,त्यांची जयंती ही डीजे मुक्त झाली पाहिजे : पो.नि. चिंचोलकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. १२ एप्रिल -**

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मोत्सव हा अगदी शांततेत व पारंपारिक वाद्यांच्या गजरात शिस्तीत पार पाडला पाहिजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महामानवाने देशालाच नव्हे तर सर्व जगाला प्रकाशमय करून शांतीचा शिस्तीचा व शिक्षणाचा आदर्श दिला आहे तेव्हा या महामानवाच्या जयंती मध्ये आंबेडकर आणू यांनी आपल्या जयंतीला गालबोट लागणार नाही असे वर्तन कोणीही करू नये असे मत शांतता कमिटीच्या बैठकीत ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर यांनी व्यक्त केले.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे महात्मा ज्योतिराव फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शांतता कमिटी च्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस नगरसेवक संजय



पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, सामाजिक कार्यकर्ते पी. एस. गवळी, रावसाहेब महाराज, यांच्यासह सिडको हडको व ग्रामीण भागातील जयंती मंडळाचे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना उपविभागीय अधिकारी प्रशांत शिंदे यांनीही महामानवाची जयंती सोहळ्यास कुठलेह गालबोट न लागता शांततेत मिरवणूक काढून महामानवास अभिवादन करावे असे आव्हान केले. या बैठकीस अग्निशामन दलाचे गायकवाड, विद्युत मंडळाचे सुरेंद्र वाघमारे, तर मनपाचे मोहन लांडगे यांनी आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये अडीअडचणी येऊ देणार नाही मिरवणूक मार्गामध्ये असलेल्या अडीअडचणी तत्परतेने सोडवण्याचा प्रयत्न करत आहोत आणि ते करून देऊ असे आश्वासन दिले. यावेळी या बैठकीस पोलीस कर्मचारी पत्रकार यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.सदरील बैठक यशस्वी करण्यासाठी गोपनीय शाखेचे बालाजी दंतापल्ले व पोलीस कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# डीजे नाही तर संस्कृतीचा नाद, डॉ. आंबेडकर जयंतीचा अनोखा, सर्वसमावेशक उत्सव

## नांदेडमध्ये जयंतीचा नवा ट्रेंड; लेझीम, घोडे आणि आदिवासी नृत्याचा जल्लोष

संविधान निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशभरात दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी केली जाते. मात्र नांदेडमध्ये यंदा ही जयंती केवळ उत्सव न राहता सामाजिक जाणीव, सांस्कृतिक जपणूक आणि सर्वसमावेशकतेचा संदेश देणाऱ्या अनोख्या पद्धतीने साजरी होत आहे.सामान्यतः जयंती उत्सवांमध्ये डीजेच्या कर्णकर्कश आवाजात नृत्य आणि जल्लोष पाहायला मिळतो. परंतु या पार्श्वभूमीवर पत्रकार इंजि. प्रवीण खंदारे यांच्या संकल्पनेतून एक वेगळा आणि सकारात्मक आदर्श उभा राहणार आहे. या उपक्रमात ध्वनीप्रदूषण टाळण्यावर विशेष भर देण्यात आला असून, पारंपरिक आणि लोककलेला प्राधान्य देण्यात आले आहे. जयंती सोहळ्यात लेझीमच्या तालावर चिमुकले आणि युवक-युवती सहभागी होणार असून, त्यांच्या सादरीकरणातून शिस्त, एकता आणि सांस्कृतिक अभिमानाचे दर्शन घडणार आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर सादर केले जाणारे आदिवासी नृत्यही या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे, ज्यामुळे स्थानिक आणि पारंपरिक कलेला प्रोत्साहन मिळणार आहे. याशिवाय, घोडे, उंट आणि बैलगाड्या सजवून त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा ठेवून भव्य रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीतून सामाजिक समता, बंधुता आणि संविधानिक मूल्यांचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. डीजेच्या मोठ्या आवाजामुळे अनेकदा ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना अशा कार्यक्रमांपासून दूर राहावे लागत होते. मात्र या नव्या संकल्पनेमुळे सर्व वयोगटातील नागरिकांना कोणत्याही अडचणीशिवाय जयंतीत सहभागी होता येणार आहे. त्यामुळे हा उपक्रम अधिक लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक ठरत आहे. ही जयंती केवळ उत्सवापुरती मर्यादित न राहता सामाजिक परिवर्तन, पर्यावरणपूरक दृष्टिकोन आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा संदेश देणारी ठरत आहे. नांदेडमधील हा उपक्रम इतर ठिकाणांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे. त्यामुळे नांदेडकरांनी या उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन डॉ.बाबासाहेबांची जयंती साजरी करावी.



**-यशपाल भोसले**

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## औशात रेशीम उद्योग विस्ताराचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. १२ एप्रिल :** औसा पंचायत समिती येथे रेशीम उद्योगाच्या विकासासाठी एक महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच आ. अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडली. औसा तालुका राज्यातील रेशीम उत्पादनाचे प्रमुख केंद्र (हब) म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने या बैठकीत सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, जिल्हा रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, उपसभापती अमोल पाटील, औसा महिला ॲग्रो प्रोड्यूसर कंपनीच्या अध्यक्षा सौ. शोभाताई पवार, पं. स. सदस्य समाधान कांबळे, तालुका कृषी अधिकारी औसा विकास लटूरे, तालुका कृषी अधिकारी निलंगा नाथराव शिंदे व निलंगा येथील प्रतिनिधी, औसा व निलंगा तालुक्यातील उमेद प्रभाग समन्वयक, तसेच महिला संचालक उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी रेशीम उद्योग हा अत्यंत प्रभावी आणि शाश्वत पर्याय ठरू शकतो, असे सांगून आमदार पवार म्हणाले की, कमी पाण्यात अधिक उत्पादन देणारी रेशीम शेती ही उसासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांना सक्षम पर्याय ठरू शकते. बदलत्या हवामान आणि वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे वळणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. बैठकीत औसा तालुक्यातील प्रत्येक गावात रेशीम शेतीचा प्रसार करण्याचा ठोस संकल्प करण्यात आला. तसेच राज्य शासनाकडून उपलब्ध असलेल्या १०० टक्के अनुदानाचा अधिकाधिक लाभशेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन संबंधित अधिकाऱ्यांनी केले. औसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी रेशीम उद्योग ही मोठी संधी असून, त्या दृष्टीने प्रशासनाकडून सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.



## विविध वृत्त...

### शाहू महाविद्यालयात फुले यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** येथील राजर्षी शा-हू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाच्या वतीने महान क्रांतिकारक व सामाजिक समरसतेचे पुरस्कर्ते महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे ग्रंथपाल सूर्यकांत मस्के, प्रा. डी. बी. सोनकांबळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी, सहाय्यक ग्रंथपाल स्वाती सावंत, डॉ. स्वाती फेरे, डॉ. रत्नराणी कोळी, डॉ. विजय दळवी, महेश शिंदे, निजाम शेख, विलास अल्टे, सिद्धेश्वरअंदुर्गे, आनंद सोमवंशी, जालिंदर राठोड इत्यादी उपस्थित होते. यावेळी डॉ. विजयकुमार करजकर यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. कल्याण सावंत यांनी केले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### काटगाव तांडा येथे राष्ट्र सेवा दलाचे नेतृत्व शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** लोकशाही समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष, विज्ञानवादी विचाराचे मैदानी प्रशिक्षक आणि बौद्धीक नेतृत्व घडावे, या उद्देशाने लातूर तालुक्यातील काटगाव तांडा येथील साने गुरुजी विद्यालय आश्रमशाळा येथे दि. २३ ते २७ एप्रिल दरम्यान राष्ट्र सेवा दलाच्या वतीने इयत्ता ७ वी ते ९ च्या विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व विकास शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित शिंदे, कार्याध्यक्ष अंकुश गायकवाड, डॉ. शिवाजी जवळगेकर, जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, डॉ. गणेश गोमारे, शेषेराव चव्हाण, माधव बावगे, उत्तरेश्वर बिराजदार आदींच्या उपस्थित झालेल्या बैठकीत सदरच्या सेवा दल शिबिरावर शिक्कामोर्तब करण्यात आले. शिबिरार्थीसाठी निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या शिबिरात लातूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग देडे, शेषेराव चव्हाण यांनी केले आहे.

### जागतिक आरोग्य दिनानिमित्त 'सीपीआर' तंत्राचे प्रात्यक्षिक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात 'सीपीआर' तंत्राचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना देण्यात आले. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांच्या टिमने मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे होते. इंडियन मेडिकल असोसिएशन लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राउत, सचिव डॉ. विश्रांत भारती, उपप्राचार्य सदाशिव शिंदे, पर्यवेक्षक डॉ. भीमराव पाटील, तज्ज्ञ डॉ. हमीद चौधरी, डॉ. मन्सूर भोसगे, डॉ. महादेव बनसोडे, डॉ. श्वेता काटकर, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. आकांक्षा त्रिपाठी आणि डॉ. स्वाती फेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी डॉ. हमीद चौधरी यांनी विद्यार्थ्यांना अपघातासारख्या विविध प्रसंगी वैद्यकीय मदत पोहोचण्यापूर्वीचा काळ अत्यंत संवेदनशील असतो. अशा वेळी 'कार्डिओ पल्मोनरी रिसुसिटेशन' (सीपीआर) मुळे एखाद्या व्यक्तीचे प्राण कसे वाचवता येतात, याचे सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सोमदेव शिंदे यांनी तर उपस्थितांचे आभार डॉ. अनिरुद्ध बिराजदार यांनी मानले. या उपक्रमास प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### बुधवारी 'डिजिटल शेती शाळा' उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर :** हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जात शेतीला अधिक शाश्वत आणि समृद्ध करण्याच्या उद्देशाने कृषी विभाग महाराष्ट्र राज्य, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पाणी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ७.३० वाजता 'डिजिटल शेती शाळा भाग-३' चे आयोजन करण्यात आले आहे. या सत्रात प्रामुख्याने 'एकात्मिक कीड व्यवस्थापन' या विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार असून, यामध्ये सापळा पिकांची लागवड, जैविक व नैसर्गिक कीड व्यवस्थापन, शेतात पक्षी थांबे उभारणे, चिकट सापळ्यांचा वापर आणि मित्र कीटकांचे संवर्धन यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानाची माहिती दिली. जाणार आहे. या तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष शेतीत योग्य वापर कसा करावा, याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळणार असल्याने सर्व शेतकरी बंधू-भगिनी, शेतकरी गट, एफपीओ आणि महिला बचत गटांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी आपल्या भागातील सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, समूह सहाय्यक किंवा कृषी ताई व कृषी सखी यांच्याशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी या विशेष डिजिटल शेती शाळेत सहभागी होण्याचे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

## आजचा महाराष्ट्र विचारांना घाबरणारा, दिशा हरवलेला : गिरीश कुबेर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल :** आजचा महाराष्ट्र विचारांना घाबरणारा, दिशा हरवलेला, लेचापेचा झाला असल्याचे परखड विधान ख्यातनाम लेखक तथा दैनिक लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांनी शनिवारी सायंकाळी लातूरकरांशी संवाद साधताना केले.छत्रपती शिवाजी महाराजांचा कालखंड सोडला तर दिल्लीत महाराष्ट्राच्या वाट्याला कायम दुय्यम स्थान मिळत गेल्याचेही त्यांनी बोलून दाखविले.

स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेच्या वतीने शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या 'कस्तूर कांचन सभागृहात आयोजित संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. पर्यावरणतज्ज्ञ ज्येष्ठ पत्रकार अतुल देऊळगावकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

महाराष्ट्रातील नेते केंद्रात क्रमांक एकचे पद घ्यायला का कचरले, घाबरले या मानसिकतेचा अध्ययन होणे गरजेचे आहे, हे सांगताना त्यांनी सचिन तेंडुलकरचे एक उत्कृष्ट उदाहरण लातूरकरांसमोर प्रस्तुत केले. सचिन तेंडुलकरला क्रिकेटचा देव असे संबोधले जाते. फलंदाजीत सर्वश्रेष्ठ असणारा सचिन कर्णधार म्हणून फारसा यशस्वी ठरला नाही, हे सगळ्यांनी पाहिल्याचे त्यांनी बोलून दाखविले. सध्यस्थितीत इराण - अमेरिका -इस्रायलच्या युद्धाचे पडसाद संपूर्ण जगावर उमटत आहेत. युद्ध या विषयाकडे आपण भावनिकतेने पाहतो. मुळात युद्ध हा एक बाजारपेठीय परिस्थितीचा भाग आहे. आर्थिकदृष्ट्या अमेरिकेला परवडेनासे झाल्यामुळे हे युद्ध थांबल्याचे मत कुबेर यांनी व्यक्त केले. 'तेल' ही संकल्पना १९३० च्या सुमारास उदयास आली. तेलाच्या मालकीमुळे महासत्ता इंग्लंडकडून अमेरिकेकडे गेली. तेल हा विषय आजच्या काळातील वादाचा नसून तो साधारणतः १५० - २०० वर्षांपासूनचा वादाचा विषय आहे. जवळपास ३५० उत्पादने तेलाशी संबंधित आहेत. उर्जेवरची मालकी महत्वाची असते. त्यासाठीच अमेरिकेने इराणशी युद्ध छेडल्याचे ते म्हणाले.

आपल्या देशात ऊर्जाविषयक धोरण देशाच्या नव्हे तर उद्योगपतीना धार्जिणे असल्याचे दिसून येते. जगात ज्या - ज्या देशांनी ऊर्जेविषयक धोरणाला महत्व दिले ते ते देश मोठे झाले. अभियांत्रिकी क्षेत्रात चीन खूप पुढे आहे. प्रगतीतही चीन आपल्या तुलनेत आघाडीवर आहे. हे न पाहता आपण चीनला किरकोळ घेतो हे चुकीचे आहे. चीन सरकारने आपले स्वतःचे उत्पन्न अमेरिकेत गुंतवल्याने अमेरिका चीनशी पंगा घेण्याच्या फंदात पडत नाही. कोणत्या गोष्टीचा वापर, अवलंब किती करावा हेही महत्वाचे असते. फेसबुकने आजमितीस सगळ्या जगाला वेड लावले आहे. पण फेसबुकच्या निर्मात्याच्या घरातच फेसबुक पाहिले जात नाही. टिकटॉक चीनने विकसित केले, पण



चीनमध्ये त्यावर बंदी असल्याचे सांगून कुबेर यांनी या बाबीकडे भारतीयांनीही गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे असे सांगितले. जगात सर्वात भ्रष्ट क्षेत्र मिलिट्री आणि फार्मास्युटिकल कक्षेत्र असल्याचेही त्यांनी नमूद केले. आपल्याकडे आर्थिक विचारच सांगितलं जात नाही. स्पर्धेत टिकण्यासाठी काय करायला हवे?, याचे आकलनच राज्यकर्त्यांना नसल्याचे त्यांनी नमूद केले.

'दाखवल्या' आणि 'खेळवल्या' जाणाऱ्या युद्धामागील सूत्रधार कोण असतात? बॉम्ब आणि क्षेपणास्त्रे न वापरता केवळ जीवजंतू पाठवून 'युद्ध' तयारी कशी होते? युद्धातून नफेखोरी कशी होते? अचाट आघाडी घेणाऱ्या चीनच्या विकासाचे स्वरूप नेमके कसे आहे? रशियाला महासत्ता बनवण्याचा ध्यास घेतलेले पुतीन कसे घडत गेले? आदी विषयांवरही अभ्यासपूर्ण भाष्य केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीनिवास लाहोटी, उपाध्यक्ष डॉ. अजित जगताप यांनी गिरीश कुबेर यांचा सत्कार केला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

## महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव कार्यकारिणी जाहीर; अध्यक्षपदी ॲड. निलेश मुचाटे तर स्वागताध्यक्षपदी प्रा.भालचंद्र येडवे पाटील

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल :** जगतज्योती महात्मा बसेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी ॲड. निलेश मुचाटे तर स्वागताध्यक्षपदी प्रा.भालचंद्र येडवे पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

लातूरच्या पाचशेघर मठ येथे लिंगायत समाजाचे जेष्ठ मार्गदर्शक सिद्रामआप्पा पोपडे यांच्या अध्यक्षतेखाली तर माजी अध्यक्ष केदारआप्पा रासुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी समाज बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत महात्मा बसवेश्वर सार्वजनिक जयंती उत्सव समितीची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.ती पुढील प्रमाणे आहे.

अध्यक्ष ॲड. निलेश मुचाटे, स्वागताध्यक्ष प्रा.भालचंद्र येडवे पाटील,उपाध्यक्ष विश्वास आंबेकर,सचिव बालाजी झिपरे, सहसचिव रोहीत चवळे,कोषाध्यक्ष लखन कावळे,





कार्याध्यक्ष मुकेश उटगे,बालाजी पाटील रायवाडीकर,गणेश हेरकर आदी.महात्मा बसवेश्वरांचे विचार सर्व स्तरापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व समाज बांधवांनी जयंतीनिमित्त आयोजित सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन स्वागताध्यक्ष प्रा.येडवे पाटील व अध्यक्ष ॲड.मुचाटे यांनी केले.अध्यक्षीय समारोप सिद्राम आप्पा पोपडे यांनी केले.प्रास्ताविक केदार रासुरे,सूत्रसंचालन संयोजक नितीन मोहनाळे तर आभार जगदीश येरटे यांनी मानले. यावेळी समितीचे उपाध्यक्ष विश्वास आंबेकर यांनी महात्मा बसवेश्वर चौक येथील बसवेश्वरांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर एलईडी बोर्ड बसविण्यासाठी स्वखर्चातून एक लाख दहा हजार रुपये रक्कम देण्याचे जाहीर केले.

यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या नूतन कार्यकारणीचा सत्कार करण्यात आला. बैठकीस बसवेश्वर हेंगणे, प्रा. ओमप्रकाश झुरुळे, ॲड. निखिल काळगे,सोमेश्वर ईश्वरशेटे, शिवकुमार रोडे, प्रमोद धुपे, लक्ष्मीकांत रासुरे, मन्मथ सोरटे, सुशील वेळापुरे, निखिल शेटकार, शरणाप्पा अंबुलगे, कल्याण लातूरे, मोहन मेंगशेट्टे, सुनील ताडमाडगे, किरण खोबरे आदिसह समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

## 'चन्नबसवेश्वर'चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल :** येथील चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालय (डिग्री) येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात पार पडले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी व उप-प्राचार्य डॉ. अविनाश टेकाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये गायन, नृत्य तसेच इतर मनोरंजक सादरीकरणांचा समावेश होता. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळाला तसेच शैक्षणिक दडपणातून काहीसा विरंगुळा मिळाला. या प्रसंगी संस्थेचे सचिव भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त अरुण विजयकुमार मठपती, हालकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, उप-प्राचार्य डॉ. अविनाश टेकाडे, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, डॉ. शिवराज नागोबा, डॉ. विवेक पंचभाई, डॉ. पद्मजा गिराम, डॉ. राम साखरे, डॉ. सुनील हिंडोळे, डॉ. शिवकुमार लद्दे, डॉ. नसीर शेख, प्रा. सारिका झिंगाडे, प्रा. रिशा वाले, प्रा. मोईन अत्तार, प्रा. महेश मानके आदींनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## २२६९ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशाची लॉटरी

### शाळेत प्रवेशासाठी २० एप्रिलपर्यंत लिंक उपलब्ध होणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल :**२०२६-२७ या वर्षाच्या आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेशाची सोडत (लॉटरी) सोमवार दि. ६ एप्रिल रोजी काढण्यात आली होती. त्यानुसार आरटीई २५ टक्के प्रवेश शाळा निहाय विद्यार्थी निवड यादी जाहीर झाली आसून लातूर जिल्हयातील २ हजार २६९ पालकांच्या पाल्यांना इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी लॉटरी लागली आहे. प्रवेशाची लॉटरी लागलेल्या पालकांच्या पाल्यांना प्रवेशासाठी एसएमएस पाठवले जात आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२ (सी) (१) नुसार दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळा या शाळांमध्ये आरटीई २५ टक्के २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. आरटीईतंर्गत पालकांच्या पाल्यांना पहिलीच्या वर्गासाठी २५ टक्के मोफत प्रवेश देण्यासाठी लातूर जिल्हयातील स्वंय अर्थसहित, विना अनुदानीत अशी आहे मोफत प्रवेशाची सोडत

नोंदणीकृत शाळेतील २५ टक्के मोफत प्रवेशाच्या जागेसाठी लॉटरी निघाली आहे. यात लातूर तालुक्यात ४१० प्रवेश होणार आहेत. तसेच अहमदपूर १३९, औसा १९४, देवणी ६६, चाकूर ७२, जळकोट २९, लातूर शहर १ मध्ये १८३, लातूर शहर २ मध्ये ५१४, निलंगा १८४, रेणापूर ६४, शिरूर अनंतपाळ ११, तर उदगीर तालुक्यातून ४०३ विद्यार्थ्यांचे प्रवेश होणार आहेत.

२०७ शाळांची नोंदणी केली आहे. या शाळेतील २ हजार ३४३ मोफत प्रवेशाच्या जागेसाठी पहिलीच्या वर्गात मोफत प्रवेश मिळावा म्हणून ६ हजार ६९९ पालकांनी ऑनलाईन अर्ज नोंदवले होते. त्या संदर्भाने मोफत प्रवेशाची सोडत (लॉटरी) दि. ६ एप्रिल रोजी निघाली. लातूर जिल्हयातील २ हजार २६९ पालकांच्या पाल्यांची पहिलीच्या वर्गात मोफत प्रवेशासाठी निवड झाल्याची लॉटरी लागली आहे. त्यानुसार १० एप्रिलपासून पालकांना प्रवेशाचे

एसएमएस येण्यास सुरूवात झाली आहे. तसेच निवड यादीतील प्रवेशाची पहिली फेरी १ कि.मी. पर्यंत, दुसरी फेरी १ कि.मी. ते ३ कि.मी. पर्यंत, तिसरी फेरी ३ कि.मी. ते ५ कि.मी. पर्यंत, चौथी फेरी ५ कि.मी. त्या पुढील हेच सुत्र दिव्यांग आरक्षणासाठी सुध्दा वापरण्यात येणार आहे. बालकांच्या पालकांना निवड झालेल्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी दि. १० ते दि. २० एप्रिल पर्यंत लिंक उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

## लातूरमध्ये जीवघेणा हल्ल्याचा प्रयत्न पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे तक्रार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल :** लातूर शहरातील मंठाळे नगर परिसरातील स्क्रॅप मार्केट येथे असलेल्या महाराष्ट्र आंध्रा ट्रान्सपोर्ट येथे एका व्यक्तीवर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदनही देण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनेश बलभीम करे (रा. गौसपुरा गल्ली नं. ६, लातूर) हे नेहमीप्रमाणे आपल्या कामाच्या ठिकाणी उपस्थित असताना, निखिल खरात, संतोष पाटोळे यांच्यासह सुमारे १० ते १२ जणांचा समूह हत्यारांसह तेथे आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सदर व्यक्ती आपल्याला जीवे मारण्याच्या उद्देशाने आल्याचे लक्षात येताच, दिनेश करे यांनी मागील भिंतीवरून उडी मारून पळ काढत स्वतःचा जीव वाचविला.

यावेळी ट्रान्सपोर्टवर उपस्थित असलेला दुसरा कामगार दत्ता गिरी याला आरोपींपैकी संतोष पाटोळे याने आपल्या जवळील चाकू काढून गळ्याखाली डाव्या बाजूस लावून जखमी केल्याची गंभीर बाब समोर आली आहे. तसेच दिनेश करे कुठे आहे, सांग, नाहीतर तुला खल्लास करतो अशी धमकी देण्यात आल्याचे पोलीस अधीक्षकांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. या घटनेनंतर काही वेळाने दिनेश करे यांनी पुन्हा ट्रान्सपोर्टवर येऊन तेथील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यामध्ये १० ते १२ जणांचा जमाव जीव घेण्याच्या उद्देशाने आल्याचे स्पष्ट दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. संबंधित सीसीटीव्ही रेकॉर्डिंग स्वतःकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.

या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित आरोपींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी तसेच पोलिस संरक्षण द्यावे, अशी मागणी दिनेश करे यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे.

## फिजिक्सवाला (PW) ने लातूरमध्ये पहिले तंत्रज्ञान-सक्षम ऑफलाइन 'विद्यापीठ' सेंटर सुरू केले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ एप्रिल :** फिजिक्सवाला (झथ) या शिक्षण कंपनीने लातूर येथे आपल्या पहिल्या तंत्रज्ञान-सक्षम ऑफलाइन 'विद्यापीठ' सेंटरचे उद्घाटन करत महाराष्ट्रातील आपली उपस्थिती अधिक बळकट केली आहे.

अंबाजोगाई रोडवरील गॅलेक्सी मॉल (दुसरा व तिसरा मजला), छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सुरू करण्यात आलेले हे केंद्र विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानासह दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने उभारण्यात आले आहे.

झथ विद्यापीठ ही तंत्रज्ञान-सक्षम ऑफलाइन शिक्षण केंद्रे असून, येथे विद्यार्थी अनुभवी शिक्षकांकडून प्रत्यक्ष उपस्थित राहून शिक्षण घेतात. या केंद्रांमध्ये गएए, छएएढ आणि फाऊंडेशन परीक्षांसाठी सर्वसमावेशक अभ्यासक्रम उपलब्ध असून, ऑलिम्पियाडसारख्या स्पर्धा परीक्षांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाते.

या केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांसाठी रेकॉर्डेड लेक्चर्स, छएएठढ मटेरियलसह सहाय्य, ऑफलाइन शंका निरसन सुविधा, डेली प्रॅक्टिस प्रॉब्लेम्स, विशेष मॉड्यूल्स, क्रियाकलाप-आधारित शिक्षण तसेच मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका (झीर्शीेंळी धशरी टीर्शीिेंपी) यांचा समावेश आहे. याशिवाय, झथ--खढड चाचण्या, डींीवशपीं डींलर्शीी ढशरा (डडढ) साठी समर्पित डेस्क आणि पालकांसाठी विद्यार्थी प्रगतीचा आढावा घेण्यासाठी झरीशपीं-ढशरलहशी ऊीहलेीव देखील उपलब्ध आहे.



यावेळी बोलताना झथ विद्यापीठ-ऑफलाइनचे उएज अंकित गुप्ता म्हणाले, झथ मध्ये आम्ही विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा अनुभव अधिक प्रभावी आणि सोयीस्कर करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहोत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी इतर शहरांमध्ये जाण्याची गरज भासू नये, हा आमचा उद्देश आहे. लातूरमध्ये हे केंद्र सुरू करून आम्ही विद्यार्थ्यांना त्यांच्या शहरातच उत्कृष्ट शिक्षण उपलब्ध करून देत आहोत. तसेच देशभरात अशा शैक्षणिक केंद्रांचे जाळे विस्तारण्याचा आमचा मानस आहे.

लातूरमधील या नव्या केंद्रामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि परवडणारे शिक्षण त्यांच्या शहरातच उपलब्ध होणार असल्याने पालक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.